एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, रविवार ३१ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२५१, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 251 Marathi - Daily - Pune, 31 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
मनोज जरांगे पाटील यांचे ९ वे उपोषण; काय आहेत प्रमुख मागण्या?
navakal.in
@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# जरांगेंची विखे-पाटलांशी चर्चा! मात्र मागण्या मान्य होईपर्यंत उन्हातील उपोषण सुरू राहणार

**मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांसाठी रणरणत्या उन्हात मनोज जरांगे-पाटील यांनी आज आमरण उपोषण सुरू केले. आजच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारचे शिष्टमंडळ त्यांच्या भेटीसाठी दाखल झाले. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जरांगेंची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मात्र, सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळूनही सर्व मागण्या लेखी स्वरूपात मान्य होईपर्यंत उपोषण स्थगित करणार नसल्याची ठाम भूमिका जरांगे यांनी घेतली.**

■ जालना

**मनोज** जरांगे म्हणाले की, सरकारे बदलतील, बैठका होतील, चर्चा होतील. मात्र समाजाच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत मी मागे हटणार नाही. मी शेतात भर उन्हात बसून उपोषण सुरू केले आहे. सरकारसोबतची चर्चाही उन्हातच करणार आहोत. उन्हात आम्ही बसू, मात्र चटके सरकारला बसतील असे ते म्हणाले.

दरम्यान, भाजपाचे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सरकारच्या वतीने तयार केलेला मसुदा आज जरांगेंना दिला. जवळपास सर्व मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. शासन स्तरावर प्रक्रिया सुरू असून, त्यावर शंभर टक्के कारवाई केली जाईल, असे आश्वासनही दिले. स्वतंत्र मराठा-कुणबी मंत्रालयाच्या मागणीबाबत निर्णय घेण्यासाठी एक महिन्याचा कालावधी मागितला.

सरकारच्या मसुद्यानुसार, मराठा आरक्षण कक्ष पुढील एका महिन्यात कार्यान्वित केला जाणार आहे. नोंदी शोधणे, प्रमाणपत्रांचे वितरण आणि जात पडताळणी प्रक्रियेसाठी आठ दिवसांत विशेष पान २ वर



## जरांगेंच्या कार्यकर्त्यांची संपत्ती कशी वाढली?

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मालमत्तेची ईडी चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जरांगेंना मारण्याची सुपारी घेतल्याच्या प्रकरणातील आरोपी अमोल खुणे याने केली आहे. अमोलने सांगितले की, जरांगे यांच्या सुरू असलेल्या उपोषणाचा संबंध ९८६ कोटी, १५० कोटी आणि ३० कोटी रुपयांच्या काही टेंडर रद्द होण्याशी आहे. ही टेंडर पुन्हा मिळवण्यासाठी हे आंदोलन सुरू आहे. मनोज जरांगे यांच्या मालमत्तेत अचानक वाढ कशी झाली? त्यांच्या काही सहकाऱ्यांनी अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी केल्या आहेत. पांडुरंग तारक यांनी ४९ एकर, गंगाधर काळकुटे यांनी चंदननगर परिसरात सात गुंठे आणि स्वप्निल तारख यांनी दीड कोटी रुपयांची जमीन कशी खरेदी केली याचा तपास व्हावा. संजय कटारे यांच्यावरील पाच कोटी रुपयांचा बोजा तहसीलदारांनी कसा माफ केला? या सर्वांची ईडीमार्फत चौकशी करून नार्को चाचणी करण्यात यावी. त्यांच्यासोबत माझीही नार्को टेस्ट करा. मी जरांगे यांच्याविरोधात सुपारी घेतल्याचे सिद्ध झाले, तर कोणतीही शिक्षा भोगण्यास तयार आहे. पण ते दोषी आढळले तर समाजाने त्यांना दगड मारून साड्या नेसवून शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी त्यांची धिंड काढली पाहिजे.

## थोडक्यात...

### प्राजक्त तनपुरे यांचा अखेर भाजपात प्रवेश

**मुंबई** -शरद पवार पक्षाचे नेते व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला. मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी खासदार सुजय विखे-पाटील उपस्थित होते. शरद पवार गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

भाजपामध्ये प्रवेश



केल्यानंतर तनपुरेंना विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चांना आता वेग आला आहे. तनपुरेंना उमेदवारी मिळाल्यास त्यांच्या विरोधात काँग्रेसकडूनही उमेदवार दिला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, तनपुरे हे शरद पवार गटाचे वरिष्ठ नेते जयंत पाटील यांचे सख्खे भाचे आहेत. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत त्यांनी शेवटच्या क्षणी माघार घेतली होती. त्यामुळे शरद पवार गटाला ऐनवेळी दुसरा उमेदवार द्यावा लागला होता. गेल्या काही महिन्यांपासून ते भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या.




### नसरापूर अत्याचार प्रकरण पीडितेच्या आई-वडिलांची साक्ष

**पुणे** - भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणी विशेष न्यायालयात आतापर्यंत सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. त्यामध्ये पीडितेचे आई-वडील, मृत्यूच्या कारणांचा पंचनामा करणारे पंच तसेच आरोपीला पीडितेसमवेत पाहिल्याचा दावा करणाऱ्या साक्षीदारांचा समावेश आहे.

या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सुरू आहे. सरकार पक्षाने आरोपीविरोधात दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रामध्ये पुरावा नष्ट केल्याचे अतिरिक्त कलम समाविष्ट करण्यासाठी अर्जही न्यायालयात सादर केला आहे. भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे रोजी साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक व अनैसर्गिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणी भीमराव प्रभाकर कांबळे (६५) याच्याविरोधात राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी न्यायालयाने आरोपीविरोधातील आरोप निश्चित केले. या खटल्यात सरकार पक्षाने एकूण ८२ साक्षीदारांची यादी सादर केली आहे.

## समस्येचा फोटो काढून पोस्ट करा कॉकरोच पार्टीची पहिली मोहीम



**सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर तरुणाईच्या सोशल मीडियावरील उद्रेकातून सुरू झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने आपल्या पहिल्या मोहिमेची घोषणा केली आहे. 'लाईफ ऑफ अ कॉकरोच' असे नाव असलेल्या या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत नागरिकांना त्यांच्या परिसरातील सरकारी यंत्रणांमधील त्रुटी, भ्रष्टाचार, अस्वच्छता, खड्डे, पाणीटंचाई, शासकीय शाळा-रुग्णालयांची दयनीय अवस्था अशा विविध समस्यांचे फोटो किंवा व्हिडिओ पुराव्यासह पोस्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

■ मुंबई

**या** मोहिमेबाबतचा एआय व्हिडिओ पार्टीच्या एक्सवर पोस्ट करण्यात आला आहे. या व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, कॉकरोच जनता पार्टी आपल्या अजेंड्यांवर प्रत्यक्ष कृती करायला कधी सुरुवात करणार, याची अनेक लोक वाट पाहत आहेत. त्यामुळे आज आपण पहिले पाऊल म्हणून एक राष्ट्रीय मोहीम सुरू करत आहोत. तिचे नाव आहे 'लाईफ ऑफ अ कॉकरोच' आहे. ही मोहीम त्या प्रत्येक कॉकरोचसाठी आहे, जो सरकारच्या अपयशामुळे आणि दुर्लक्षामुळे त्रस्त आहे. जे लोक आपला आवाज उठवू शकत नाहीत किंवा ज्यांचा आवाज योग्य ठिकाणी पोहोचत नाही, त्यांना अनेकदा दुर्लक्षित वाटते. त्यांना असे वाटते की, तक्रार करून तरी काय होणार? कारण नेते आणि अधिकारी यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे. लाईफ ऑफ पान २ वर

## दक्षिण मुंबईत सतत वीज खंडित बेस्ट बेपर्वा ! तक्रारीला उत्तरच नाही

■ मुंबई

**ऐन** उन्हाळ्यात काही दिवसांपासून दक्षिण मुंबईत विजेचा लपंडाव सुरू आहे. गिरगाव व दादर भागातील वीज रात्री जाण्याचे प्रकार सुरू आहेत. काल रात्री गिरगावातील सीपी टँक परिसरातील फाटकवाडी भागात वारंवार वीजपुरवठा खंडित झाला. दादरच्या काही भागांतही काही दिवसांपासून वीज जाण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे तेथील नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागले. विशेषतः रात्रीच्या वेळी वीज जात असल्याने रहिवाशांना भयंकर उकाड्यात राहावे लागत आहे. परंतु तक्रार करूनही बेस्टकडून उत्तर मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तक्रार नोंदविण्यासाठी संपर्क साधला असता संबंधित दूरध्वनी क्रमांकावर कोणीही प्रतिसाद देत नाही. तसेच व्हॉट्सॲपद्वारे पाठविलेल्या तक्रारींनाही कोणताही प्रतिसाद मिळत नाही. वारंवार वीजखंडितमुळे ज्येष्ठ नागरिक, मुले आणि व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## विषारी दारूकांड मृतांचा आकडा २२ पोलीस, उत्पादन शुल्कचे २२ जण निलंबित

■ पुणे

**पुणे,** पिंपरी-चिंचवड आणि उरळी कांचन परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले असून, मृतांचा आकडा आता २२ वर पोहोचला. या प्रकरणात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी ९ पोलीस आणि १३ उत्पादन शुल्क अधिकारी अशा २२ जणांना निलंबित करण्यात आले. या प्रकरणाच्या तपासाची सूत्रे सीआयडीकडे सोपविण्यात आली आहेत.

उरळी कांचन येथील ३२ वर्षीय रिक्षाचालक उमेश अवचर याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याने २ दिवसांपूर्वी गावठी दारूचे सेवन केले होते. त्यानंतर त्यांना दृष्टी मंदावणे, मळमळ, उच्च रक्तदाबाचा त्रास आणि तोंडातून फेस येणे अशी लक्षणे दिसून आली. रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. तपासात त्यांनी ज्या ठिकाणाहून दारू घेतली होती, तो अड्डा आरोपी राधेश्याम प्रजापतीच्या अवैध दारू व्यवसायाशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणातील तपासादरम्यान धक्कादायक माहिती उघड झाली. अधिक नफा मिळवण्यासाठी आरोपी योगेश वानखेडे याने दारूमध्ये मिथेनॉल हे घातक रसायन मिसळल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

## ४५ वर्षांच्या शिवसेनेतील प्रवासानंतर गुलाबराव पाटील भाजपात जाणार?

■ जळगाव

**विधान** परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागावाटपावरून सुरू असलेल्या कुरबुरीला नवे वळण मिळाले आहे. जळगावची जागा भाजपाच्या वाट्याला जाण्याची शक्यता व्यक्त होत असताना पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि त्यांचे पुत्र प्रताप पाटील भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा आहे.

गुलाबराव यांनी प्रताप यांच्या उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींकडे जोरदार प्रयत्नही सुरू केले होते. याच पार्श्वभूमीवर गुलाबराव आणि प्रताप आता भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.या चर्चांवर प्रतिक्रिया देताना गुलाबराव पाटील म्हणाले की, जळगावच्या जागेबाबत दोन वेळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. एकाच विषयावर वारंवार बोलणे योग्य नाही. शेवटी महायुतीतील वरिष्ठ नेतेच जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतील. मात्र त्यांनी भाजपा प्रवेशाच्या चर्चांचे स्पष्ट खंडन न केल्याने राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## मुंबईत सीएनजी-पीएनजी महागले १५ दिवसांत दुसऱ्यांदा दरवाढ

■ मुंबई

**मुंबईत** महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ केली असून, घरगुती वापरासाठीच्या पाईप नॅचरल गॅसच्या (पीएनजी) दरातही प्रति स्टँडर्ड क्युबिक मीटर (एससीएम) ५० पैशांची वाढ जाहीर केली. सुधारित दर मध्यरात्रीपासून लागू झाले आहेत.

नव्या दरवाढीनंतर मुंबई महानगर प्रदेशात सीएनजीचा दर ८४ रुपयांवरून ८६ रुपये प्रति किलो झाला. तर पीएनजीचा दर प्रति युनिट ५२ रुपयांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे गेल्या १५ दिवसांत एमजीएलकडून करण्यात आलेली ही दुसरी दरवाढ आहे. १३ मे रोजी एमजीएलने सीएनजीच्या दरात प्रति



किलो २ रुपयांची वाढ झाली होती. त्याआधी एप्रिल महिन्यातही सीएनजीचा दर १ रुपयांनी वाढवण्यात आला होता. दुसऱ्यांदा भाववाढीमुळे वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पेट्रोल -डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे अनेकांनी सीएनजीकडे स्वस्त पर्याय म्हणून पाहिले होते.

## अँटिलिया प्रकरणी माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांची याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**उद्योगपती** मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेरील स्फोटके आणि त्यानंतर उद्योजक मनसुख हिरेन यांच्या हत्येप्रकरणी आरोपी असलेल्या माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांची मुक्ततेची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

मुंबईतील रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या दक्षिण मुंबईतील बहुमजली निवासस्थान 'अँटिलिया' जवळ २५ फेब्रुवारी २०२१ रोजी स्फोटकांनी भरलेली स्कॉर्पिओ आढळली होती. त्यानंतर या प्रकरणाशी संबंधित मनसुख हिरेन यांची हत्या झाली होती. या प्रकरणात शर्मा यांच्यावर सहभागाचा आरोप ठेवण्यात आला. त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले.



न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने शर्मा यांच्यातर्फे बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांना सांगितले की, या टप्प्यावर जामीन किंवा अटकपूर्व जामिनाचा विचार करता येऊ शकतो. मात्र या प्रकरणात आरोपीला पूर्णपणे मुक्त करता येणार नाही.

रोहतगी यांनी न्यायालयात सांगितले की, शर्मा यांच्याविरोधात त्यांनी माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे यांची भेट घेतली होती, असा एकमेव आरोप आहे.

## पायांना सूज! हातांवर खुणा! वजन वाढले तरीही राष्ट्राध्यक्ष ट्रम्प पूर्णपणे तंदुरुस्त

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वैद्यकीय तपासणीत ते पूर्णपणे निरोगी असल्याचे त्यांच्या डॉक्टरांनी सांगितले आहे. मात्र, त्यांच्या पायांच्या खालच्या भागात सौम्य सूज आणि हातांवर किरकोळ जखमांच्या खुणा असल्याचे व त्यांचे वजन काहीसे वाढल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद करण्यात आले आहे.**

■ वॉशिंग्टन :

**ट्रम्प** यांची वैद्यकीय तपासणी मंगळवारी वाल्टर रिड नॅशनल मिलिटरी मेडिकल सेंटर येथे करण्यात आली. या संपूर्ण



प्रक्रियेवर २२ तज्ज्ञ डॉक्टरांनी देखरेख ठेवली होती. डॉ. शॉन बारबेला यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, ट्रम्प यांची सीटी स्कॅन, हृदयाशी संबंधित विविध इमेजिंग चाचण्या, कर्करोग तपासणी तसेच इतर प्रतिबंधात्मक आरोग्य चाचण्या करण्यात आल्या. या सर्व तपासण्यांनंतर ट्रम्प यांची प्रकृती अत्यंत चांगली असून, राष्ट्राध्यक्ष म्हणून कर्तव्ये पार पाडण्यासाठी ते पूर्णपणे सक्षम असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. अहवालात नमूद करण्यात आले आहे की, ट्रम्प यांच्या पायांच्या खालच्या भागातील सूज मागील वर्षाच्या तुलनेत कमी झाली आहे. पान २ वर

## मोदींविरोधात बनावट पोस्ट प्रकरणी मधू किश्वरांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

■ चंदीगड

**पंजाब** आणि हरियाणा उच्च न्यायालयाने मोदी यांची बदनामी करणाऱ्या सोशल मीडियावर पोस्ट प्रकरणी शिक्षणतज्ज्ञ मधू पूर्णिमा किश्वर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अमन चौधरी यांनी स्पष्ट केले की, विधायक टीका करणे आणि कोणाची तरी बदनामी करण्यासाठी सोशल मीडियावर पोस्ट करणे यात मोठा फरक आहे. चंदीगड पोलिसांनी तपासात सामील होण्यासाठी किश्वर यांना तीन वेळा नोटीस पाठवली होती. परंतु त्या हजर झाल्या नाहीत. न्यायालयाने त्यांच्या या वर्तनाला 'तपासात असहकार्य' मानले. या बनावट व्हिडिओचे मूळ काय आहे आणि हा कट कोणी रचला, हे शोधण्यासाठी आरोपीची कोठडीत चौकशी करणे आवश्यक असल्याचे सांगत न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला. विशेष सरकारी वकील अमित झांजी यांनी सांगितले की, संबंधित व्हिडिओ दुसऱ्या व्यक्तीने फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्यूबवर अपलोड केला होता. तो डाऊनलोड करून किश्वर यांनी स्वतःच्या एक्स पोस्ट केला. त्यांच्या एक्स खात्यावर १८ लाख फॉलोअर्स असल्याने हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला.

## रायगड विधान परिषद जागेसाठी आ. दळवींच्या कन्येचा अपक्ष अर्ज

■ रायगड

**राज्यातील** विधान परिषद निवडणुकांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे दोन दिवस बाकी आहेत. मात्र, अद्यापही महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. असे असतानाच आज अलिबागचे शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली जुईकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीतील तणाव पुन्हा उफाळून येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अर्ज दाखल केल्यानंतर जुईली जुईकर म्हणाल्या की, आमच्यावर वारंवार अन्याय होत असल्याने त्याला वाचा फोडण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. आम्ही तटकरेंच्या विरोधात आहोत.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, जुईली यांनी नेमक्या कोणत्या कारणासाठी अर्ज दाखल केला, याबाबत महेंद्र दळवी यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

नवाकाळ
Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

भुमी वर्ल्ड भिवंडी येथील प्रिंटींग प्रेसकरीता पंचींग मशीन, फॉयलिंग मशीन, लॅमिनेशन मशीनसाठी ऑपरेटर व ऑफसेट मशीन SM-74 करीता फीडरमॅन, बॉयलर, प्रिंटर हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार, PF, ESIC, ग्रॅच्युईटी, बोनस योगेश- **9769232850.** {NC260688}

हाऊसकीपिंग बॉईज, पगार रु. १५००० ते रु. १६०००, येण्या जाण्याचा रेल्वे पास मिळेल. ट्युलीप्स हाऊसकीपिंग संपर्क- आशिष- **7506802071** {NC260720}

लेथ मशीन टर्नर, ड्रिलिंग टॅपिंग व हॅंडप्रेस पॉवरप्रेस मेटलशीट व मेटल बफिंग, बेंडिंग व प्लास्टिक इंजेक्शन मोल्डिंग मशीनचे हुशार कारागीर, हेल्पर मुले/मुली व एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. २४० शांती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, तांबे नगर, एसएन रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080. दिलीप पांचाळ **9221232176** {NC260684}

दादर येथील फॅब्रिक कंपनीत सेल्समन आणि हेल्पर साठी नोकरीची संधी आहे. कॉल/व्हॉटसॅप **9082746846** {NC260689}

**ठाणे येथील सुसंस्कृत कुटुंबास २४ तासासाठी स्वयंपाकीण बाई पाहिजे. संपर्क - 9867086273, 9987546590 {NC260739}**

ऑफसेट मशीन ऑपरेटर फिडरमेन हेडलबर्ग 72V मशीनसाठी बोईलर पाहिजेत भिवंडी (मनकोली) **9324903643/ 9867946135** {NC260745}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पॅंट्रीबॉय- मुलुंड, दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे, **8422880511/ 8291056761/ 8422880515/9221560330/ 9326200875** {NC260571}

दहावी पास/नापास ५ मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी विरार ते भाईंदर परिसरातील राहणारे **9833911797** {NC260635}

महानगर गॅस विक्रीची नोकरी. पगार रु. २५००० पर्यंत संपर्क **7021727174** क्षेत्र गोरेगाव ते वांद्रे {NC260752}

धुळे आणि शिरपूर येथे नामांकित शाळा आणि कॉलेजमध्ये त्वरित हाऊसकिपिंग मॅनेजर, हाऊसकिपिंग सुपरवायझर त्वरित पाहिजेत. (वयोमर्यादा- ४५ वर्षापर्यंत) पत्ता:- ४१४, ई - विंग, ४था माळा, झी-कार्पोरेट पार्क, opp. सनसिटी सिनेमा, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व) satguruenterprise1@gmail.com, **9326007480, 9820426010** {NC260748}

## पाहिजेत

मुंबई सेंट्रल येथील नामांकीत सोसायटीसाठी सिक्युरिटी सुपरवायझर- पगार ₹22,000/- सिक्युरिटी गार्ड- पगार ₹20,000/- ड्युटीः 8 तास, साप्ताहिक सुट्टी, PF व ESIC सुविधा संपर्कः **8591979285/ 8591979289.** पत्ताः G9, सिक्युरिटी फोर्स त्रिवणी सदन, 1st, करीरोड (पूर्व), मुंबई- 400012. {NC260749}

एअरपोर्ट जॉब ओपनिंग्स पदेः लोडर, हाऊसकीपिंग (HK), बारटेंडर, शेफ, ग्राउंड स्टाफ, PSA, CSA, प्रमोटर इत्यादी. पगारः ₹20,000 ते ₹65,000 प्रतिमहिना सुविधाः लंच, PF, ESIC, प्रवास भत्ता (Traveling Allowance) संपर्कः तनिषा - **8591912932 / 8097351102** अधिक माहितीसाठी व अर्ज करण्यासाठी वरील क्रमांकावर संपर्क साधा. {NC260758}

पेपर लॅमिनेशन ऑपरेटर UV मशिन ऑपरेटर हेल्पर मुले-मुली Mobile NO. **9930408427** चर्नीरोड, गिरगाव {NC260759}

## Situation Vacant

Required DTP Operator with Full knowledge of Corel Draw Experienced Preferred Please Contact- **9223428456** or Email: admin@libraclips.com {NC260746}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## प्रॉपर्टी

**भव्य घरकुल योजना, मंगलमूर्ती अपार्टमेंट G+5 एरिया 550-18,00,000/- (Cash)/ 25,00,000/-** (**लोन 80%**) **बुकींग-1,00,000/- नालासोपारा पश्चिम. 9870316444 {NC260574}**

## जागा विकणे आहे

नायगांव (ईस्टमध्ये): 1BHK-20 लाखात विकणे. (लोन-पाणीची सुविधा.)- **9769491030** {NC260761}

## विवाहविषयक

जीवन जोडी शुभारंभ वधु वरमध्ये मुलींसाठी मोफत नोंदणी कविता **7977883961** {NC260747}


# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात आरोपी अमोल गायकवाडला दिलासा नाही

■ मुंबई

**माजी** मंत्री बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपी अमोल गायकवाड याचा जामीन अर्ज विशेष सत्र न्यायालयाने फेटाळला. हल्लेखोरांना आश्रय देण्यामध्ये त्याची महत्त्वाची भूमिका असल्याचे सकृतदर्शनी पुराव्यांवरून दिसून येत असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्याला जामीन देण्यास नकार दिला.

१२ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री वांद्रे (पूर्व) येथे बाबा सिद्दीकी यांची त्यांच्या मुलगा झीशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास मोक्का अंतर्गत सुरू असून विशेष सत्र न्यायालयात सुनावणी होत आहे.विशेष मोक्का न्यायालयाचे न्यायाधीश सत्यनारायण आर. नवंदर यांनी दिलेल्या आदेशात अमोल गायकवाड हा संघटित गुन्हेगारी टोळीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे नमूद केले. तसेच, गुन्हा घडल्यानंतर हल्लेखोरांना आश्रय देण्याची जबाबदारी त्याच्याकडे सोपवण्यात आली होती आणि ही भूमिका त्याला हत्येच्या कटाशी जोडणारी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. गायकवाड याने आपल्या जामीन अर्जात आपण निर्दोष असून खोट्या आरोपांखाली गोवण्यात आल्याचा दावा केला होता. तसेच अटक करताना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील संबंधित तरतुदींचे पालन झाले नसल्याचा मुद्दाही त्याच्या वकिलांनी उपस्थित केला. याशिवाय, त्याचा कबुलीजबाब दबाव आणि धमक्यांखाली घेण्यात आल्याने तो ग्राह्य धरता येणार नाही, असा युक्तिवादही बचाव पक्षाने केला. पण पोलीस आणि सिद्दीकी कुटुंबीयांनी या जामीन अर्जाला विरोध केला. आरोपांचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे लक्षात घेता आरोपीला जामीन देणे योग्य ठरणार नसल्याचे नमूद करत विशेष सत्र न्यायालयाने अमोल गायकवाड याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

# दक्षिण मुंबईतील ८२ धोकादायक इमारतींना म्हाडाकडून नोटीस

■ मुंबई

**म्हाडाच्या** मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने केलेल्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात यंदा तब्बल ८२ इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे. या इमारतींमधील रहिवाशांना जागा रिकाम्या करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून, संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी स्थलांतराची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यापूर्वी मुंबई शहरातील जुन्या व जीर्ण उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात अतिधोकादायक ठरलेल्या ८२ इमारतींमध्ये मागील वर्षी धोकादायक घोषित करण्यात आलेल्या ४३ इमारतींचाही समावेश आहे. पावसाळ्यात इमारती कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन म्हाडाने ही यादी जाहीर केली आहे.म्हाडाच्या माहितीनुसार, या ८२ इमारतींमध्ये २,२५६ निवासी आणि ४८० अनिवासी असे एकूण २,७३६ गाळेधारक व रहिवासी आहेत. यापैकी १७६ निवासी गाळेधारकांना तातडीने गाळे रिकामे करण्यासाठी नोटीस देण्यात आल्या आहेत.

नोटीस मिळालेल्यांपैकी २९ रहिवाशांनी म्हाडाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतर केले असून ३६ जणांनी स्वतःच्या पर्यायी निवासाची व्यवस्था केली आहे.

# कल्याण-डोंबिवलीत १२ तास पाणीपुरवठा बंद

■ कल्याण

**कल्याण-डोंबिवली** शहरांसह ग्रामीण भागातील पाणीपुरवठा २ जून रोजी १२ तास बंद राहणार असल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक तेवढाच पाणीसाठा करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, नेतिवली आणि टिटवाळा येथील जलशुद्धीकरण केंद्रांमधून होणारा पाणीपुरवठा मंगळवारी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. पाणीपुरवठा विभागाकडून तांत्रिक आणि देखभाल कामे हाती घेतली जाणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत कल्याण पूर्व व पश्चिम, डोंबिवली पूर्व व पश्चिम तसेच कल्याण ग्रामीण भागातील मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि इतर परिसरांमध्ये पाणीपुरवठा खंडित होणार आहे. पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश डावरे यांनी केले आहे.

# ऑपरेशन सिंदूर २ साठी सज्ज आहोत

पान ८ वरून

नागरिकांच्या सुरक्षेबाबत अत्यंत सावध राहणे आवश्यक आहे.युद्धाचा वेग वाढत असताना जलद निर्णय घेण्यासाठी तंत्रज्ञान, ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनरल द्विवेदी यांनी सांगितले की, भविष्यातील युद्ध केवळ जमीन, हवा आणि समुद्रापुरती मर्यादित राहणार नाहीत. सायबर, अंतराळ आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्येही संघर्षाचे स्वरूप वाढणार आहे. भारतीय सेना 'डिकेड ऑफ ट्रान्सफॉर्मेशन' उपक्रमाअंतर्गत भविष्यातील आव्हानांसाठी स्वतःला सज्ज करत असून आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या लष्करी संरचनेला प्राधान्य दिले जात आहे. दरम्यान, या परेडमध्ये १२ मित्र राष्ट्रांतील २४ परदेशी कॅडेट्सनीही सहभाग घेतला. विविध देशांतून आले असले तरी एनडीएने सर्वांना समान मूल्ये आणि आदर्शांनी एकत्र बांधल्याचे जनरल द्विवेदी यांनी सांगितले.

# पायांना सूज! हातांवर खुणा! वजन वाढले तरीही राष्ट्राध्यक्ष ट्रम्प पूर्णपणे तंदुरुस्त

पान १ वरून- तसेच हातांवरील जखमांच्या खुणाही सामान्य स्वरूपाच्या आहेत. वैद्यकीय तपासणीनंतर ७९ वर्षीय ट्रम्प यांनी, सर्व काही उत्तमआहे, अशी प्रतिक्रिया दिली. त्यांचे वजन २३८ पाउंड (सुमारे १०८ किलो) नोंदविण्यात आले, जे एप्रिल २०२५ मधील तपासणीच्या तुलनेत १४ पाउंड (सुमारे ६ किलो) अधिक आहे. डॉक्टरांनी त्यांना आहारावर नियंत्रण ठेवणे, नियमित शारीरिक हालचाल वाढवणे आणि वजन कमी करण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, त्यांच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतांबाबत कोणतीही चिंता नसून त्या उत्कृष्ट असल्याचे डॉक्टरांनी नमूद केले आहे. जून महिन्यात ट्रम्प ८० वर्षांचे होणार आहेत. ते अनेकदा स्वतःची तुलना माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्याशी करताना आपण अधिक ऊर्जावान आणि तंदुरुस्त असल्याचा दावा करतात. जो बायडेन यांनी वयाच्या ८२ व्या वर्षी राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यकाळ पूर्ण केला होता.

# घाटकोपरमध्ये कुर्बानीची परवानगी भाजपा पदाधिकाऱ्याचीच मागणी

■ मुंबई

**बकरी** ईदच्या पार्श्वभूमीवर कुर्बानीच्या मुद्द्यावरून घाटकोपरमधील सागर पार्क सोसायटीत भाजपामध्येच मतभेद उघड झाले आहेत. काही दिवसांपासून सोसायट्यांमध्ये बकऱ्यांची कुर्बानी देण्यास भाजपा नेते किरीट सोमय्या आक्रमकपणे विरोध करत आहेत. घाटकोपरमधील सागर पार्क सोसायटीतही त्यांनी प्रत्यक्ष भेट देत कुर्बानीला विरोध दर्शवला होता. मात्र, याच सोसायटीत कुर्बानीसाठी भाजपाचेच पदाधिकारी चंद्रकांत मालकर यांनी परवानगी मागितली होती. मालकर हे सागर पार्क सोसायटीचे सचिव असून ते भाजपाच्या ईशान्य मुंबई विभागात जिल्हा महामंत्री पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे पक्षाच्या भूमिकेशी विसंगत वाटणारी ही बाब उघड झाल्यानंतर भाजपाच्या स्थानिक संघटनेत खळबळ उडाली. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत भाजपाने मालकर यांच्याकडून खुलासा मागितला. जिल्हाध्यक्ष दीपक दळवी यांनी परवानगी अर्जामागील कारण, तो कोणत्या भूमिकेतून करण्यात आला. पक्षाच्या अधिकृत भूमिकेशी त्याचा संबंध काय, याबाबत स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे.

# बंगालमध्ये अभिषेक बॅनर्जींना मारहाण अंडी फेकली! चोर-चोरच्या घोषणा

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील सोनारपूर दक्षिण येथे तृणमूलचे कॉंग्रेसचे खासदार आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर आज संध्याकाळी हल्ला झाला. ते निवडणुकीतील हिंसाचाराचे बळी ठरलेल्या तृणमूलचे कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना भेटायला गेले होते. तिथे पोहोचताच भाजपश कार्यकर्त्यांनी त्यांना घेरले आणि घोषणाबाजी करत त्यांच्यावर हल्ला केला. लोकांनी त्यांच्यावर दगड, चपला आणि अंडी फेकली, तसेच त्यांचा शर्ट फाडला आणि चोर- चोर अशा घोषणा दिल्या. हेल्मेट घालून अभिषेक यांना घटनास्थळावरून बाहेर काढण्यात आले.

खासदार अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, त्यांनी माझ्याबाबतीत जे केले ते पूर्वनियोजित होते. या परिसरात पोलीस नाहीत. त्यांना मला मारायचे आहे. हेल्मेटमुळे माझे डोके वाचले. पण आम्ही अशा हल्ल्यांना घाबरणार नाही. ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मी या घटनेबाबत उच्च न्यायालयात दाद मागणार आहे आणि राज्यपालांनाही याची माहिती देईन. जोपर्यंत स्थानिक पोलीस आपले दल पाठवून पीडितांच्या कुटुंबीयांना सुरक्षा देत नाहीत, तोपर्यंत मी गप्प बसणार नाही.

दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात असलेले सोनारपूर हे एक अत्यंत संवेदनशील क्षेत्र मानले जाते. येथे तृणमूलचे कॉंग्रेस आणि भाजप यांच्यात तीव्र लढत होत असून तिथे निवडणुकीदरम्यान आणि निवडणुकीनंतर राजकीय हिंसाचार वारंवार घडत असतो.

# जरांगेंची विखे-पाटलांशी चर्चा

पान १ वरून

हेल्पलाइन सुरू केली जाणार आहे. कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी स्वतंत्र कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना १५ दिवसांत आर्थिक मदत दिली जाणार आहे. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याचे मसुद्यात नमूद आहे. मात्र, केवळ आश्वासनांवर समाधान न मानता जरांगे यांनी अभासाकांशी चर्चा करूनच पुढील भूमिका जाहीर करणार असल्याचे सांगितले. सर्व मागण्या पूर्णपणे मान्य होईपर्यंत उपोषणस्थळ सोडणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. खासदार शाहू महाराज यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. कुणबी आणि मराठा समाज एकच असल्याचे सांगत त्यांनी सरकारने याबाबत सकारात्मक तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेणार ! मुख्यमंत्री फडणवीसांनी स्पष्ट केले

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात आमच्या सरकारने जेवढे ठोस निर्णय घेतले आहेत, तेवढे महाराष्ट्राच्या इतिहासात यापूर्वी कधीही घेतले गेले नाहीत. परंतु, कोणतेही निर्णय घेताना आपल्याला भारतीय संविधान, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे व चौकटीचे काटेकोर पालन करावेच लागेल. न्यायालयाच्या निर्देशांचा अनादर करून जर घाईघाईने कोणताही निर्णय घेतला, तर त्यातून केवळ तात्पुरती प्रसिद्धी मिळेल, परंतु न्यायालयात तो टिकणार नाही आणि समाजाच्या हातामध्ये काहीही पडणार नाही. त्यामुळे कायद्याच्या व संविधानाच्या कसोटीवर शंभर टक्के खरे उतरतील, असेच शाश्वत निर्णय सरकार घेईल. एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला दिले असे कधीही केले नाही. त्यामुळे ओबीसी समाजालाही घाबरण्याची आवश्यकता नाही. त्यांच्यावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही.

# लॉटरी

## गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी — निकाल — सोडत सायं. 5:00 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 30/05/2026

| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-04 : 2742 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7869 | महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |
|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3216 | |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0547 | 0635 | 1115 | 2443 | 3244 | 3306 | 5384 | 5505 | 6463 | 8205 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0815 | 1681 | 3043 | 3045 | 5824 | 6342 | 7775 | 8385 | 9336 | 9408 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0415 | 1233 | 2907 | 3944 | 6086 | 6400 | 7557 | 8132 | 9144 | 9457 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1288 | 2162 | 3045 | 4064 | 4906 | 5953 | 7062 | 7777 | 8645 |
| | | 1299 | 2182 | 3053 | 4075 | 4934 | 5962 | 7076 | 7779 | 8668 |
| | | 1307 | 2260 | 3202 | 4099 | 4974 | 5974 | 7090 | 7820 | 8673 |
| 0020 | 0843 | 1346 | 2272 | 3271 | 4151 | 4998 | 6076 | 7099 | 7963 | 8716 |
| 0027 | 0853 | 1349 | 2307 | 3322 | 4189 | 5030 | 6125 | 7127 | 7974 | 8738 |
| 0028 | 0900 | 1408 | 2362 | 3413 | 4214 | 5044 | 6179 | 7163 | 7979 | 8817 |
| 0077 | 0919 | 1423 | 2387 | 3532 | 4236 | 5045 | 6256 | 7174 | 7987 | 8830 |
| 0225 | 0946 | 1598 | 2412 | 3538 | 4391 | 5254 | 6261 | 7199 | 8032 | 8852 |
| 0235 | 0963 | 1614 | 2434 | 3615 | 4404 | 5269 | 6388 | 7257 | 8138 | 8872 |
| 0364 | 0987 | 1636 | 2526 | 3632 | 4410 | 5359 | 6525 | 7278 | 8150 | 9024 |
| 0378 | 1087 | 1710 | 2632 | 3645 | 4433 | 5376 | 6575 | 7287 | 8158 | 9194 |
| 0401 | 1110 | 1771 | 2693 | 3651 | 4491 | 5407 | 6582 | 7372 | 8193 | 9262 |
| 0424 | 1115 | 1816 | 2722 | 3685 | 4502 | 5452 | 6603 | 7376 | 8209 | 9313 |
| 0433 | 1150 | 1871 | 2836 | 3692 | 4571 | 5515 | 6650 | 7399 | 8276 | 9438 |
| 0435 | 1155 | 1875 | 2858 | 3747 | 4591 | 5595 | 6658 | 7427 | 8317 | 9593 |
| 0496 | 1160 | 1889 | 2871 | 3853 | 4599 | 5714 | 6665 | 7459 | 8384 | 9851 |
| 0504 | 1179 | 1891 | 2917 | 3866 | 4620 | 5734 | 6683 | 7536 | 8481 | 9859 |
| 0522 | 1194 | 1914 | 2924 | 3940 | 4704 | 5772 | 6691 | 7574 | 8482 | 9951 |
| 0523 | 1195 | 2020 | 2943 | 3946 | 4805 | 5881 | 6791 | 7677 | 8489 | 9975 |
| 0728 | 1235 | 2125 | 2995 | 4017 | 4846 | 5918 | 6883 | 7767 | 8532 | 9979 |
| 0774 | 1270 | 2152 | 3027 | 4048 | 4894 | 5949 | 6968 | 7771 | 8635 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी — निकाल — सोडत संध्या. 4:45 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 30/05/2026

| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-02 : 6872 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0307 | 0431 | 1516 डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली | 1846 श्री गणेश एन्टरप्राइसेस, दादर, मुंबई | 2232 पवार लॉटरी, ठाणे | 3179 | 3334 | 5494 | 6211 | 6225 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0231 | 0521 | 0556 | 0840 | 1350 | 3236 | 5587 | 6226 | 8145 | 8277 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0395 | 1752 | 2082 | 3950 | 4962 | 5197 | 6217 | 7010 | 7039 | 8264 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0915 | 1199 | 2087 | 6351 | 6658 | 7171 | 7459 | 7966 | 8333 | 8961 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1301 | 1916 | 2703 | 3602 | 4428 | 5037 | 6114 | 7072 | 8086 | 8889 |
| | | 1324 | 1951 | 2727 | 3617 | 4448 | 5073 | 6163 | 7074 | 8089 | 8987 |
| 0002 | 0708 | 1326 | 2022 | 2782 | 3623 | 4456 | 5098 | 6167 | 7178 | 8110 | 9019 |
| 0004 | 0792 | 1331 | 2062 | 2882 | 3641 | 4467 | 5106 | 6194 | 7186 | 8221 | 9044 |
| 0025 | 0802 | 1333 | 2093 | 2895 | 3662 | 4483 | 5217 | 6206 | 7213 | 8298 | 9091 |
| 0028 | 0803 | 1400 | 2182 | 2918 | 3747 | 4487 | 5255 | 6216 | 7537 | 8319 | 9094 |
| 0089 | 0888 | 1431 | 2205 | 2933 | 3781 | 4503 | 5307 | 6346 | 7671 | 8337 | 9235 |
| 0097 | 0901 | 1443 | 2218 | 2989 | 3783 | 4504 | 5314 | 6362 | 7677 | 8389 | 9319 |
| 0239 | 0910 | 1454 | 2233 | 3022 | 3843 | 4513 | 5428 | 6468 | 7701 | 8403 | 9328 |
| 0261 | 0939 | 1518 | 2250 | 3035 | 3891 | 4528 | 5435 | 6553 | 7706 | 8484 | 9354 |
| 0267 | 0994 | 1571 | 2259 | 3092 | 3934 | 4545 | 5460 | 6588 | 7737 | 8506 | 9369 |
| 0272 | 1036 | 1591 | 2284 | 3099 | 3938 | 4568 | 5575 | 6638 | 7783 | 8579 | 9400 |
| 0403 | 1108 | 1674 | 2323 | 3199 | 3979 | 4654 | 5663 | 6642 | 7824 | 8584 | 9461 |
| 0419 | 1123 | 1681 | 2329 | 3214 | 4044 | 4685 | 5835 | 6663 | 7853 | 8590 | 9539 |
| 0435 | 1134 | 1685 | 2332 | 3252 | 4064 | 4792 | 5852 | 6674 | 7860 | 8629 | 9559 |
| 0460 | 1149 | 1707 | 2340 | 3318 | 4230 | 4797 | 5908 | 6682 | 7875 | 8649 | 9578 |
| 0515 | 1159 | 1712 | 2370 | 3368 | 4279 | 4911 | 5927 | 6796 | 7877 | 8682 | 9592 |
| 0550 | 1161 | 1780 | 2466 | 3371 | 4321 | 4914 | 5943 | 6825 | 7912 | 8694 | 9759 |
| 0567 | 1175 | 1830 | 2477 | 3393 | 4344 | 4946 | 5975 | 6886 | 7914 | 8703 | 9906 |
| 0581 | 1188 | 1843 | 2526 | 3454 | 4384 | 4953 | 6067 | 7051 | 7928 | 8743 | 9945 |
| 0607 | 1212 | 1860 | 2542 | 3465 | 4404 | 4992 | 6086 | 7053 | 7964 | 8774 | 9983 |
| 0621 | 1217 | 1908 | 2637 | 3487 | 4414 | 5024 | 6106 | 7071 | 8080 | 8881 | 9990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर शनिवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 22 • सोडत दिनांक 30/05/2026

| बक्षिस | क्रमांक | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | ML-03 : 2121 | प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 2121 | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2189 | प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0349 | 0635 | 3674 | 4621 | 4693 | 5772 | 6371 | 6815 | 6926 | 7718 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1261 | 2416 | 2590 | 3679 | 4148 | 4396 | 5653 | 7260 | 8224 | 9493 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1394 | 2219 | 2428 | 3494 | 5261 | 5877 | 6076 | 6842 | 6873 | 9842 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0426 | 1117 | 1349 | 1425 | 1775 | 2279 | 2838 | 4044 | 4852 | 6841 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1668 | 2235 | 3131 | 3951 | 4532 | 5457 | 6103 | 6689 | 7608 | 8245 | 8853 | 9379 |
| | | 1686 | 2238 | 3161 | 3955 | 4537 | 5471 | 6123 | 6729 | 7627 | 8265 | 8855 | 9394 |
| | | 1694 | 2246 | 3162 | 3960 | 4552 | 5502 | 6133 | 6744 | 7630 | 8298 | 8864 | 9397 |
| | | 1705 | 2252 | 3163 | 3983 | 4559 | 5508 | 6134 | 6775 | 7632 | 8301 | 8871 | 9406 |
| | | 1721 | 2257 | 3184 | 4056 | 4615 | 5512 | 6141 | 6786 | 7634 | 8349 | 8875 | 9407 |
| 0000 | 0759 | 1723 | 2260 | 3203 | 4060 | 4619 | 5520 | 6167 | 6819 | 7710 | 8374 | 8878 | 9414 |
| 0004 | 0800 | 1744 | 2261 | 3229 | 4124 | 4620 | 5521 | 6186 | 6836 | 7716 | 8474 | 8880 | 9418 |
| 0008 | 0820 | 1754 | 2272 | 3253 | 4129 | 4641 | 5528 | 6192 | 6861 | 7722 | 8476 | 8882 | 9419 |
| 0015 | 0912 | 1800 | 2280 | 3262 | 4145 | 4647 | 5536 | 6216 | 6867 | 7731 | 8480 | 8884 | 9429 |
| 0025 | 0933 | 1805 | 2305 | 3310 | 4146 | 4655 | 5545 | 6217 | 6917 | 7747 | 8481 | 8889 | 9440 |
| 0032 | 0947 | 1812 | 2323 | 3318 | 4157 | 4791 | 5549 | 6232 | 7015 | 7761 | 8490 | 8898 | 9511 |
| 0050 | 0984 | 1827 | 2332 | 3333 | 4201 | 4796 | 5555 | 6262 | 7048 | 7769 | 8491 | 8928 | 9581 |
| 0056 | 0993 | 1861 | 2342 | 3340 | 4222 | 4816 | 5561 | 6278 | 7056 | 7776 | 8498 | 8964 | 9591 |
| 0059 | 1010 | 1874 | 2355 | 3343 | 4243 | 4849 | 5564 | 6286 | 7087 | 7781 | 8499 | 8968 | 9592 |
| 0072 | 1018 | 1910 | 2362 | 3367 | 4244 | 4859 | 5565 | 6320 | 7098 | 7786 | 8513 | 8984 | 9603 |
| 0091 | 1042 | 1917 | 2417 | 3378 | 4256 | 4867 | 5574 | 6347 | 7107 | 7797 | 8538 | 8988 | 9627 |
| 0094 | 1082 | 1952 | 2462 | 3393 | 4261 | 4904 | 5581 | 6374 | 7128 | 7799 | 8571 | 8998 | 9628 |
| 0113 | 1101 | 1964 | 2482 | 3401 | 4267 | 4941 | 5587 | 6394 | 7147 | 7817 | 8590 | 9004 | 9693 |
| 0151 | 1111 | 1971 | 2485 | 3417 | 4271 | 4944 | 5617 | 6443 | 7148 | 7819 | 8601 | 9090 | 9696 |
| 0154 | 1116 | 2012 | 2523 | 3422 | 4303 | 4952 | 5637 | 6446 | 7170 | 7821 | 8637 | 9096 | 9719 |
| 0203 | 1118 | 2022 | 2604 | 3450 | 4316 | 5015 | 5665 | 6454 | 7195 | 7824 | 8680 | 9145 | 9738 |
| 0254 | 1120 | 2023 | 2629 | 3473 | 4332 | 5018 | 5686 | 6463 | 7210 | 7830 | 8688 | 9149 | 9749 |
| 0268 | 1159 | 2028 | 2649 | 3538 | 4334 | 5024 | 5793 | 6470 | 7257 | 7873 | 8692 | 9154 | 9791 |
| 0366 | 1163 | 2037 | 2751 | 3555 | 4340 | 5101 | 5795 | 6476 | 7260 | 7877 | 8698 | 9169 | 9810 |
| 0382 | 1164 | 2068 | 2760 | 3613 | 4360 | 5109 | 5801 | 6482 | 7266 | 7910 | 8714 | 9183 | 9843 |
| 0386 | 1188 | 2095 | 2782 | 3631 | 4374 | 5115 | 5805 | 6483 | 7281 | 7933 | 8727 | 9186 | 9860 |
| 0402 | 1192 | 2111 | 2825 | 3637 | 4385 | 5148 | 5855 | 6514 | 7309 | 7973 | 8737 | 9188 | 9893 |
| 0409 | 1194 | 2112 | 2859 | 3699 | 4400 | 5153 | 5865 | 6526 | 7335 | 8004 | 8763 | 9191 | 9899 |
| 0413 | 1217 | 2120 | 2860 | 3703 | 4411 | 5155 | 5885 | 6529 | 7347 | 8067 | 8778 | 9195 | 9903 |
| 0427 | 1218 | 2175 | 2909 | 3713 | 4412 | 5165 | 5890 | 6549 | 7362 | 8069 | 8779 | 9196 | 9904 |
| 0479 | 1278 | 2176 | 2915 | 3723 | 4434 | 5172 | 5932 | 6608 | 7372 | 8070 | 8782 | 9271 | 9905 |
| 0551 | 1281 | 2188 | 2958 | 3728 | 4439 | 5225 | 5934 | 6614 | 7378 | 8089 | 8794 | 9290 | 9907 |
| 0562 | 1304 | 2200 | 3010 | 3738 | 4444 | 5227 | 5935 | 6624 | 7411 | 8118 | 8798 | 9293 | 9918 |
| 0580 | 1512 | 2207 | 3021 | 3772 | 4465 | 5236 | 5948 | 6626 | 7436 | 8170 | 8809 | 9298 | 9936 |
| 0627 | 1518 | 2209 | 3042 | 3793 | 4470 | 5245 | 5954 | 6631 | 7437 | 8174 | 8822 | 9303 | 9939 |
| 0658 | 1529 | 2216 | 3053 | 3825 | 4480 | 5301 | 5977 | 6632 | 7463 | 8180 | 8828 | 9320 | 9945 |
| 0660 | 1574 | 2221 | 3066 | 3834 | 4482 | 5333 | 6047 | 6636 | 7470 | 8184 | 8830 | 9348 | 9960 |
| 0666 | 1618 | 2222 | 3120 | 3835 | 4483 | 5355 | 6048 | 6669 | 7487 | 8187 | 8833 | 9359 | 9963 |
| 0684 | 1634 | 2225 | 3123 | 3894 | 4494 | 5384 | 6050 | 6670 | 7489 | 8198 | 8834 | 9362 | 9964 |
| 0701 | 1656 | 2232 | 3125 | 3930 | 4529 | 5417 | 6066 | 6676 | 7607 | 8204 | 8844 | 9373 | 9982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# समस्येचा फोटो काढून पोस्ट करा! कॉकरोच पार्टीची पहिली मोहीम

पान १ वरून

अ कॉकरोच मोहीम अशा नेत्यांवर आणि अधिकाऱ्यांवर कृती करण्यासाठी दबाव निर्माण करेल. ज्यांना

ते दिवस-रात्र देशद्रोही म्हणतात, त्या भारतीय तरुणांना आणि सामान्य नागरिकांना कोणत्या परिस्थितीत जगावे लागते हे त्यांना दाखवेल.

या मोहिमेनुसार प्रत्येक कॉकरोचने आपल्या परिसरातील कोणत्याही सरकारी यंत्रणेतील समस्येचा फोटो किंवा व्हिडिओ काढून पोस्ट करा,असे आवाहन केले आहे. त्यासाठी इंटरनेटवर जीपीएस कॅमेरासारखी अनेक ॲप्स आहेत जी फोटो किंवा व्हिडिओवर वेळ आणि गुगल लोकेशन दाखवतात. तुम्हाला तुमचा चेहरा दाखवायचा नसेल, तर हरकत नाही, फक्त समस्या दाखवा, लोकेशन टॅग जोडा आणि त्या फोटो किंवा व्हिडिओमध्ये कॉकरोच जनता पार्टीला टॅग करा. तसेच लाइफ ऑफ अ कॉकरोच किंवा कॉकरोचजिंदगी हा हॅशटॅग वापरा. सीजेपी अशा प्रत्येक पोस्ट आणि तक्रारीला प्रसिद्धी देईल. विविध स्तरांवर प्रशासन आणि नेत्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करेल. ज्या मुद्द्यांबाबत सर्वाधिक तक्रारी येतील, त्यावर माहिती अधिकारात अर्ज दाखल केल्या जातील. माध्यमांचे लक्ष वेधले जाईल,आवश्यकतेनुसार निधी संकलन आणि याचिका मोहीमा राबवल्या जातील. आता निवडून आलेल्या नेत्यांकडे डोळेझाक करण्याचा पर्याय उरलेला नाही. यामध्ये सरकारी शाळा, महाविद्यालये किंवा रुग्णालयांची दयनीय अवस्था,घराबाहेर साचलेला कचरा,उघडे खड्डे किंवा नाले, पिण्याच्या पाण्याची किंवा हवेची प्रदूषित स्थिती, दलित, आदिवासी, शेतकरी किंवा महिलांवर होणारा व्यवस्थेचा अन्याय, सरकारी कार्यालयांमधील उघडपणे सुरू असलेला भ्रष्टाचार या गोष्टींचा समावेश आहे.

कॉकरोच पार्टीच्या मते, २ कोटी फॉलोअर्स एकत्र आल्यास सरकारी व्यवस्थेवर प्रभावी दबाव निर्माण होऊ शकतो. लाइफ ऑफ अ कॉकरोच ही केवळ सोशल मीडिया मोहीम नसून जनसहभागातून उत्तरदायित्वाची मागणी करणारी चळवळ आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील समस्यांचे फोटो किंवा व्हिडिओ पोस्ट करून सहभागी व्हावे आणि व्यवस्थेतील वास्तव पुराव्यासह देशासमोर आणावे.

## महाराष्ट्र सह्याद्री — प्रभालक्ष्मी विकली लॉटरी — निकाल — सोडत सायं. 4:30 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 30/05/2026

| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-01 : 6320 |
|---|---|

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0625 | 0684 | 0723 | 3439 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | 5558 | 5924 | 6178 | 7962 | 8108 | 8805 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0221 | 0564 | 0989 | 1198 | 1568 | 2451 | 2707 | 6403 | 7229 | 8375 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0276 | 0618 | 0955 | 3603 | 4986 | 5552 | 6373 | 7398 | 7435 | 9723 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0888 | 1699 | 2754 | 4146 | 5100 | 6527 | 7671 | 9046 |
| | 1040 | 1717 | 2826 | 4154 | 5157 | 6821 | 7677 | 9191 |
| 0063 | 1073 | 1750 | 2889 | 4231 | 5537 | 6864 | 7686 | 9218 |
| 0170 | 1081 | 1761 | 2928 | 4350 | 5615 | 6915 | 7770 | 9295 |
| 0202 | 1164 | 1824 | 3031 | 4406 | 5839 | 7086 | 7894 | 9497 |
| 0300 | 1201 | 2115 | 3373 | 4413 | 5954 | 7139 | 8197 | 9659 |
| 0380 | 1262 | 2211 | 3384 | 4414 | 6000 | 7147 | 8289 | 9840 |
| 0500 | 1302 | 2291 | 3473 | 4440 | 6023 | 7213 | 8483 | 9850 |
| 0505 | 1340 | 2391 | 3691 | 4664 | 6116 | 7238 | 8503 | 9899 |
| 0537 | 1494 | 2522 | 3744 | 4671 | 6177 | 7332 | 8820 | 9917 |
| 0662 | 1515 | 2527 | 3994 | 4711 | 6216 | 7528 | 8858 | 9939 |
| 0860 | 1561 | 2570 | 4043 | 4723 | 6322 | 7599 | 8879 | 9950 |
| 0880 | 1648 | 2729 | 4145 | 4891 | 6416 | 7605 | 9019 | 9981 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


**-: वाचकांना सूचना :-**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# भटक्या गायींसाठी चारा गोळा करा उत्तर प्रदेशात शिक्षकांना नवा आदेश

■ बरेली

**उत्तर** प्रदेशातील बरेली जिल्ह्यातील मूलभूत शिक्षण विभागाच्या नव्या आदेशामुळे सरकारी शाळांतील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जनगणनेच्या कामात आधीच गुंतलेल्या शिक्षकांना आता भटक्या जनावरांच्या देखभालीसाठी चारा गोळा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

आदेशानुसार, प्रत्येक शाळेला ४६ किलो गवत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी देण्यात आली असून प्रत्येक विकासखंडाला १०० क्विंटल चारा जमा करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. हा चारा एका आठवड्याच्या आत गटविकास अधिकारी किंवा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जमा करायचा आहे. जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार मूलभूत शिक्षण अधिकारी यांनी हा आदेश जारी केला असून, कामात निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित शाळा आणि शिक्षकांविरुद्ध कडक विभागीय कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. या आदेशानंतर शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली. अनेक शिक्षकांनी सांगितले की, ते आधीच जनगणना, निवडणूक कामे, बीएलओची जबाबदारी आणि मतदार यादी पुनरावलोकन यांसारख्या शैक्षणिक कामांबाहेरील अनेक जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

# चीनचे स्टेशन, जगाला टेन्शन!

**चीनने पायाभूत सुविधा आणि अभियांत्रिकी क्षेत्रात पुन्हा एकदा संपूर्ण जगाला तोंडात बोटे घालण्यास भाग पाडले आहे. केवळ ३८ महिन्यांच्या विक्रमी वेळेत चीनने डोंगरावर जगातील सर्वात मोठे हाय-स्पीड रेल्वे स्टेशन उभारले आहे. 'चॉन्गकिंग ईस्ट रेल्वे स्टेशन' असे या महाप्रकल्पाचे नाव असून, त्याच्या बांधकामसाठी प्रगत रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला आहे. नैऋत्य चीनमधील चॉन्गकिंग शहरात उभारण्यात आलेले हे रेल्वे स्टेशन म्हणजे रोबोक्रांतीने जगाला दिलेला धक्का आहे. सुमारे १२ लाख ते १२.२ लाख चौरस मीटर क्षेत्रफळात पसरलेल्या या भव्य रेल्वे स्टेशनच्या उभारणीसाठी तब्बल ७.८ अब्ज डॉलर्स इतका प्रचंड खर्च आला आहे. सपाट जमिनीऐवजी एका दुर्गम डोंगराळ भागावर हे स्टेशन बांधणे हे अभियंत्यांसमोर सर्वात मोठे आव्हान होते. हे बांधकाम सुरू करण्यापूर्वी अभियंत्यांनी संपूर्ण डोंगराचा त्रिमितीय नकाशा तयार केला. त्यानंतर नियंत्रित स्फोटांच्या सहाय्याने खडकाळ भाग काढून टाकला आणि डोंगर कापून संपूर्ण जागा सपाट व संरचनात्मकदृष्ट्या मजबूत करण्यात आली.**

**या** भव्य रेल्वे स्टेशनवर एकूण २९ प्लॅटफॉर्म आणि १५ रेल्वे ट्रॅक आहेत. गर्दीच्या वेळी दर तासाला सुमारे १६,००० प्रवाशांना हाताळण्याची या स्टेशनची क्षमता आहे. या स्टेशनची इमारत तब्बल आठ मजल्यांची असून, येथील प्लॅटफॉर्मची लांबी ४०० मीटरपेक्षा जास्त आहे, जेणेकरून चीनच्या नेटवर्कमधील अत्यंत लांब हाय-स्पीड ट्रेन्स येथे सहज उभ्या राहू शकतील. ८ मजल्यांच्या या अवाढव्य इमारतीमध्ये रेल्वे वाहतुकीसह मेट्रो मार्ग, बस सेवा, टॅक्सी स्थानक, व्यावसायिक दुकाने आणि हॉटेल अशा सर्व नागरी सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जमिनीखाली सुमारे ३० मीटर खोलवर विविध मेट्रो मार्गांचे जाळे जोडले गेले आहे. प्रकल्पाच्या उभारणीमध्ये तब्बल ३६,६०,००० टन स्टील आणि २०,००,००० क्युबिक मीटर काँक्रीटचा वापर करण्यात आला

या अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महाकाय प्रकल्पाचे काम अवघ्या ३८ महिन्यांत पूर्ण करण्यासाठी चीनने रोबोंची मोठी फौज आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. बांधकामासाठी पाच जी नेटवर्क आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे सहाय्य घेण्यात आले. काँक्रीटचे पृष्ठभाग अत्यंत अचूकतेने सपाट करण्यासाठी लेझर-गाइडेड क्रीट रोबो तैनात करण्यात आले होते. तसेच सुमारे ८०० किलो वजनाचे अवाढव्य काचेचे पॅनेल्स उचलण्यासाठी आणि ते योग्य जागी बसवण्यासाठी विशेष काच स्थापन करणाऱ्या रोबोंचा वापर करण्यात आला. यामुळे कामाचा वेग तर वाढलाच, पण अपघातांचा धोकाही पूर्णपणे टळला. याशिवाय २४ तास देखरेख ठेवणारे रोबो आणि वेल्डिंग रोबोदेखील सातत्याने कार्यरत होते.


शहाजी शिंदे,
संगणक अभियता

या प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान सुमारे २० लाख घनमीटर काँक्रीट आणि ३ लाख ६६ हजार टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे. कामाच्या अतिशय व्यस्त काळात सुमारे ४०,००० मजूर आणि तंत्रज्ञ येथे एकत्र काम करत होते. या रेल्वे स्टेशनचे १६,५०० टन वजनाचे अवाढव्य स्टीलचे छप्पर जमिनीवर तयार करून हायड्रॉलिक प्रणालीद्वारे ५७ मीटरवर उचलण्यात आले. अभियांत्रिकी कौशल्याचे अद्भूत उदाहरण म्हणून याकडे पाहिले जात आहे. हे छप्पर ४१ मीटर उंच असलेल्या झाडाच्या आकाराच्या स्टीलच्या स्तंभांवर आधारलेले असून, भूकंप रोखण्यास आणि स्टेशनला स्थिरता देण्यास सक्षम आहेत. या संपूर्ण कामासाठी सुमारे ७.५ अब्ज डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार जवळपास ६४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला आहे.

चॉन्गकिंग ईस्ट रेल्वे स्टेशन हे चीनच्या वेगाने विस्तारणाऱ्या हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हे स्टेशन नैऋत्य चीनला बीजिंग,



शांघाय, ग्वांगझू, चेंगडू, वुहान आणि झियान यांसारख्या देशातील १४ प्रमुख शहरांशी जोडणार आहे. पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर हे स्टेशन चीनमधील सर्वात महत्त्वाचे वाहतूक केंद्र आणि आधुनिक पायाभूत सुविधांचे एक जागतिक प्रतीक ठरेल. हे स्थानक जागतिक वाहतूक क्षेत्रात आणि आधुनिक बांधकामाच्या इतिहासात एक मैलाचा दगड ठरले आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारी एक अभूतपूर्व क्रांती सध्या चीनमध्ये आकाराला येत आहे आणि ती म्हणजे 'रोबोट रिव्होल्युशन'. उत्पादनाचा खर्च कमी करणे, जागतिक बाजारपेठेवर हुकूमशाही मिळवणे आणि मानवी श्रमाला पर्याय निर्माण करणे या उद्देशाने चीनने आपल्या कारखान्यांचे वेगाने 'ऑटोमेशन' सुरू केले आहे. ही तांत्रिक प्रगती जगातील इतर देशांच्या सरकारांना आणि जागतिक रोजगार बाजाराला मोठा हादरा देणारे एक आर्थिक वादळ ठरली आहे.

चीनने आपल्या १५ व्या पंचवार्षिक योजनेत (२०२६-२०३०) रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेला (एआय) देशाच्या औद्योगिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या ताज्या अहवालानुसार, जगात दरवर्षी जेवढे औद्योगिक रोबो तयार आणि तैनात केले जातात, त्यापैकी तब्बल ५४ टक्के रोबो एकट्या चीनमध्ये बसवले जात आहेत.

चीनमधील कारखान्यांमध्ये सध्या २० लाखांपेक्षा जास्त औद्योगिक रोबो कार्यरत असून, ही संख्या जगातील दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या जपानपेक्षा साडेचार पटींनी जास्त आहे. चीनमध्ये 'डॉक फॅक्टरीज' ही संकल्पना वेगाने विस्तारत आहे. उदाहरणार्थ, चॉन्गकिंगमधील 'चांगआन ऑटोमोबाईल डिजिटल इंटेलिजन्स फॅक्टरी'मध्ये तब्बल २,००० पेक्षा जास्त रोबो मानवी श्रमाशिवाय अवघ्या ६० सेकंदांत एक कार तयार करतात. यामुळे उत्पादनाचा खर्च २० टक्क्यांनी कमी झाला आहे. एवढेच नव्हे, तर चीन आता 'ह्युमनॉइड रोबोट्स' च्या निर्मितीमध्ये ८० टक्के जागतिक बाजारपेठेवर ताबा मिळवून आहे.

रोबोंच्या सहाय्याने चीन अत्यंत स्वस्त दरात आणि अद्भुत अचूकतेने वस्तूंची निर्मिती करत आहे. या पार्श्वभूमीवर आता इतर देशांनी ऑटोमेशन स्वीकारले नाही, तर त्यांच्या देशांतर्गत उत्पादित वस्तू चिनी वस्तूंच्या तुलनेत महाग ठरतील आणि बाजारपेठेतून बाद होतील. येत्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्या प्रगत पायाभूत सुविधा आणि रोबोटिक ऑटोमेशन उपलब्ध असेल अशाच देशांमध्ये आपले कारखाने उभारण्यास पसंती देणार आहेत. इतर देश या शर्यतीत मागे पडले, तर त्यांना भविष्यात रोबोट्स, त्यांचे सुटे भाग आणि तंत्रज्ञानासाठी पूर्णपणे चीनवर अवलंबून राहावे लागेल. त्यामुळे अमेरिका, युरोपीय देश आणि भारत यांसारख्या अर्थव्यवस्थांना स्वदेशी रोबोटिक्सच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी देणे भाग पडत आहे.

वास्तविक रोबोटिक्स क्रांतीचा सर्वात मोठा आणि थेट फटका रोजगार बाजाराला (एम्प्लॉयमेंट) बसत आहे. हा परिणाम द्विस्तरीय आहे. कारखान्यांमध्ये होणारी मानवी मजुरांची कपात हे याचे प्रमुख लक्षण आहे. पॅकेजिंग, वेल्डिंग, असेंब्ली लाईन आणि साठवणूक (लॉजिस्टिक्स) यांसारखी पुनरावृत्ती होणारी कामे रोबोट्स पूर्णपणे स्वतःकडे घेत आहेत. सुरक्षेचा कोणताही धोका न पत्करता आणि २४ तास अविरत काम करण्याची क्षमता असल्यामुळे कंपन्या मजुरांऐवजी रोबोंना प्राधान्य देत आहेत. यामुळे विशेषतः विकसनशील देशांमधील कमी कौशल्य असलेल्या कामगारांच्या रोजगारावर मोठी गदा आली आहे. परिणामी, सरकारांसमोर सर्वात मोठे आव्हान हे आहे की, उत्पादकता वाढवताना आपल्या नागरिकांचे रोजगार कसे वाचवायचे? यासाठी सरकारांना आपल्या शिक्षण पद्धतीत बदल करून तरुण पिढीला 'एआय' आणि 'रोबोटिक्स'चे प्रगत शिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच, ज्या कामगारांचे पारंपरिक रोजगार धोक्यात आले आहेत, त्यांचे नवीन तंत्रज्ञानानुसार 'अपस्किलिंग' (कौशल्य वृद्धी) करणे हाच यावरील एकमेव शाश्वत उपाय ठरणार आहे. चीनने याबाबतही मोठी आघाडी घेतली असल्याने भविष्यातील रोबोटिक्स क्रांतीत चीन बाजी मारण्याची शक्यता नाकारता येत नाही.

>>> रविवार विशेष

# संघराज्य संतुलन आणि घटनात्मक विवेकाची गरज

**देशातील लोकसभा निवडणूक क्षेत्रांच्या पुनर्रचनेचा वाद केवळ उत्तर विरुद्ध दक्षिण किंवा मोठ्या विरुद्ध लहान राज्यांचे राजकारण एवढ्यापुरता मर्यादित नाही, तर येत्या दशकांमध्ये संसदेची रचना, राज्यांचा वाटा आणि केंद्र-राज्य संबंधांची दिशा ठरवणारा मुद्दा आहे. प्रतिनिधित्वाचे असंतुलन आणि मतदार-खासदार यांच्यातील वाढते अंतर यामुळे ही चिंता अधिक गडद झाली आहे. म्हणूनच परिसीमनाचा विचार करताना घटनात्मक विवेक आणि संघराज्यातील समतोल राखणेही तितकेच आवश्यक आहे.**



**लोकसभा** निवडणूक क्षेत्रांच्या पुनर्रचना म्हणजेच परिसीमनाचा वाद पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, अनेकदा हा वाद उत्तर विरुद्ध दक्षिण अशा संघर्षाच्या सीमेपर्यंत पोहोचताना दिसतो. लोकसभेचा आकार, राज्यांचा वाटा आणि महिला आरक्षणाची अंमलबजावणी यांच्याशी संबंधित प्रश्न या मुद्द्याला अधिक संवेदनशील बनवतात. भविष्यात जर जागांचे पुनर्वितरण लोकसंख्येच्या प्रमाणात केले गेले, तर वेगाने लोकसंख्या वाढणाऱ्या राज्यांचे प्रतिनिधित्व वाढू शकते, तर संथ गतीने लोकसंख्या वाढणाऱ्या राज्यांचे प्रमाण घटू शकते. ही बाब विशेषतः दक्षिण भारत आणि काही लहान तसेच ईशान्येकडील राज्यांच्या चिंतांशी जोडलेली आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण भारत म्हणजे केवळ मतदारांच्या संख्येची बेरीज नसून, अनेक भाषा, संस्कृती आणि राजकीय अनुभवांचा एक संघ आहे.

संसदेतील राज्यांची ताकद केवळ लोकसंख्याच ठरवणार का, हा यातील मुख्य प्रश्न आहे. येथे लोकशाहीचा अर्थ केवळ 'एक व्यक्ती, एक मत' असा असू शकत नाही, तर त्यासोबत 'एक राज्य, एक सन्मानजनक आवाज' हाही जोडलेला आहे. जर लोकसंख्येलाच प्रतिनिधित्वाचा एकमेव निकष बनवले गेले, तर उत्तम कामगिरी करणारी राज्यांमध्ये आपल्यावर अन्याय झाल्याची भावना निर्माण होऊ शकते, तर दुसरीकडे अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांचे नागरिक आपल्या मताच्या मूल्यावर प्रश्न उपस्थित करू शकतात. हाच अंतर्विरोध परिसीमनाला आजच्या भारताचा एक महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न बनवण्यास कारणीभूत ठरत आहे.


हरवंश दीक्षित,
घटनातज्ज्ञ

हा वाद केवळ उत्तर विरुद्ध दक्षिण किंवा मोठ्या विरुद्ध लहान राज्यांचे राजकारण एवढ्यापुरता मर्यादित नाही, तर येत्या दशकांमध्ये संसदेची रचना, राज्यांचा वाटा आणि केंद्र-राज्य संबंधांची दिशा ठरवणारा मुद्दा आहे. म्हणूनच परिसीमनाचा विचार करताना घटनात्मक विवेक आणि संघराज्यातील समतोल राखणेही तितकेच आवश्यक आहे. संविधानाचे अनुच्छेद ८१ लोकसभेत राज्यांनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था करते आणि अनुच्छेद ८२ प्रत्येक जनगणनेनंतर परिसीमनाचा मार्ग मोकळा करते. सैद्धांतिकदृष्ट्या ही व्यवस्था न्याय्य वाटते. कारण लोकशाहीत प्रतिनिधित्वाचा आधार लोकसंख्या हाच असतो. परंतु भारतासारख्या संघराज्य पद्धती म्हणजेच फेडरल स्ट्रक्चर असणाऱ्या देशात हा प्रश्न एवढा सोपा नाही.

प्रतिनिधित्वाचे असंतुलन आणि मतदार-खासदार यांच्यातील वाढते अंतर यामुळे ही चिंता अधिक गडद झाली आहे. १९७० च्या दशकात अशी भीती व्यक्त केली गेली होती की, जर प्रत्येक जनगणनेनंतर जागांचे पुनर्वितरण केवळ लोकसंख्येच्या आधारावर केले गेले, तर ज्या राज्यांनी कुटुंब नियोजन, शिक्षण, आरोग्य आणि लोकसंख्या नियंत्रणात उत्तम काम केले आहे, ती राज्ये राजकीय प्रतिनिधित्वात मागे पडू शकतात. याच कारणामुळे लोकसभा आणि विधानसभांच्या जागांच्या पुनर्वितरणावर बंदी घालण्यात आली, जी नंतर ८४ व्या संविधान दुरुस्तीद्वारे २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेपर्यंत वाढवण्यात आली. या व्यवस्थेमागे अशी चिंता होती की, उत्तम सामाजिक कामगिरी करणाऱ्या राज्यांना त्यांच्याच चांगल्या कामगिरीची शिक्षा मिळता कामा नये. दक्षिण भारतातील अनेक राज्यांनी शिक्षण, आरोग्य आणि लोकसंख्या नियंत्रणात लक्षणीय प्रगती केली आहे. जर या प्रगतीचा परिणाम राजकीय भागीदारी कमी होण्यात झाला, तर ते संघराज्य पद्धतीच्या न्यायाच्या दृष्टीने असंतोष निर्माण करू शकते.

दुसरीकडे, अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांची चिंताही महत्त्वाची आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थानसारख्या राज्यांमध्ये एका खासदारावर मतदारांचा बोजा प्रचंड वाढला आहे. जर एक खासदार लाखो मतदारांचे आणि मोठ्या भूभागाचे प्रतिनिधित्व करत असेल, तर जनसामान्यांच्या समस्यांपर्यंत त्याची प्रत्यक्ष पोहोच असणे कठीण होऊन बसते. या समस्येवर तोडगा काढण्याचा रस्ता संघ-राज्यातील समतोलातूनच जातो. या दृष्टीने लोकसभेच्या आकारावर पुनर्विचार करणे आवश्यक मानले जाऊ शकते. समस्या लोकसभेचा आकार वाढवण्यात नाही, तर त्याच्या सूत्रात आणि वेळेत आहे. जर जागांची संख्या वाढवली जात असेल, तर कोणत्याही राज्याचा सध्याचा वाटा कमी होईल की नाही, हे स्पष्ट झाले पाहिजे. सर्व राज्यांना किमान सुरक्षेची हमी दिली जाईल का, लोकसंख्या नियंत्रणात चांगली कामगिरी करणाऱ्या राज्यांना न्याय मिळेल का, लहान राज्ये आणि ईशान्येकडील राज्यांचा आवाज राष्ट्रीय संसदेत अधिक कमकुवत तर होणार नाही ना, या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे शोधणे गरजेचे आहे. त्याशिवाय परिसीमनाची प्रक्रिया राजकीय वाद आणि प्रादेशिक असंतोष निर्माण करू शकते.

लोकसभा आणि राज्यसभा यांच्यातील समतोलाचा प्रश्नही या वादाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. लोकसभा लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करते, तर राज्यसभा राज्यांचे प्रतिनिधित्व करते. परंतु भारतीय राज्यसभा ही अमेरिकन सिनेटप्रमाणे प्रत्येक राज्याला समान प्रतिनिधित्व देत नाही. येथेही राज्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्वात फरक आहे. त्यामुळे जर लोकसभेत मोठ्या राज्यांचा प्रभाव खूप जास्त वाढला आणि राज्यसभाही त्याला संतुलित करण्यास पुरेशी सक्षम ठरली नाही, तर संघराज्य रचनेत असंतुलन निर्माण होण्याची भीती वाढू शकते. भारतासारख्या विविधतापूर्ण देशात ही परिस्थिती अत्यंत काळजीपूर्वक विचार करण्याजोगी आहे. यावर उपाय संघर्षात नसून समतोलामध्ये आहे.

पहिला उपाय म्हणजे कोणत्याही राज्याच्या सध्याच्या लोकसभा जागांच्या वाट्याला किमान सुरक्षा असावी; जेणेकरून जागा कमी होणार नाहीत. दुसरा उपाय म्हणजे नवीन जागांचे वाटप लोकसंख्येसोबतच भौगोलिक विस्तार, प्रशासकीय सुलभता आणि प्रादेशिक समतोल लक्षात घेऊन केले जावे. तिसरा उपाय म्हणून लहान आणि ईशान्येकडील राज्यांचा आवाज विशेष घटनात्मक संवेदनशीलतेने सुरक्षित केला जावा. चौथा उपाय म्हणजे राज्यसभेच्या भूमिकेकडे संघराज्य समतोलाचे एक माध्यम म्हणून अधिक गांभीर्याने पाहिले जावे. या सगळ्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिसीमनाच्या मुद्यावर सर्वपक्षीय आणि आंतर-राज्यीय सहमती निर्माण व्हावी. ही प्रक्रिया केवळ कायदेशीर स्वरूपाची नसून, सामाजिक आणि राजकीय विश्वासावर आधारित असली पाहिजे. परिसीमनाचा उद्देश केवळ जागांच्या सीमांच्या रेषा आखणे एवढाच नसून, प्रतिनिधित्वाची एक न्याय्य व्यवस्था निर्माण करणे हा देखील आहे. (लेखक टीमएयू विद्यापीठाचे डीन आहेत.)




# भारत-ओमान वायूवाहिनी प्रकल्प का गरजेचा?

**पश्चिम आशियातील अस्थिरतेने आणि होर्मुज सामुद्रधुनीभोवती निर्माण झालेल्या तणावाने भारताच्या ऊर्जा सुरक्षेविषयीचा प्रश्न बिकट बनला आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असलेल्या भारताला औद्योगिक विस्तार, शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे प्रचंड प्रमाणात ऊर्जा लागते. मात्र या ऊर्जेचा मोठा भाग अजूनही परदेशातून आयात करावा लागतो. विशेषतः द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या बाबतीत भारताची अवलंबित्वाची स्थिती चिंताजनक मानली जाते. अशा परिस्थितीत भारत आणि ओमान यांना जोडणाऱ्या खोल समुद्रातील वायूवाहिनी प्रकल्पाची चर्चा पुन्हा वेगाने सुरू झाली असून, ती भारताच्या दीर्घकालीन सामरिक आणि आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित सकारात्मक घडामोड म्हणावी लागेल.**

**अरबी** समुद्राच्या तळातून सुमारे २००० किलोमीटर लांबीची ही प्रस्तावित समुद्री वायूवाहिनी ओमानला थेट गुजरात किनाऱ्याशी जोडणार आहे. या मार्गामुळे भारताला केवळ ओमानकडूनच नव्हे, तर संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, इराण आणि तुर्कमेनिस्तानसारख्या वायूसंपन्न राष्ट्रांकडूनही अधिक स्थिर आणि सातत्यपूर्ण नैसर्गिक वायू पुरवठा होऊ शकणार आहे. अंदाजे ४०,००० कोटी रुपयांचा प्रकल्प यशस्वी झाला, तर भारताला येत्या अनेक दशकांपर्यंत गॅस तुटवड्याचा सामना करावा लागणार नाही. या पाईपलाईनमुळे दररोज सुमारे ३१ दशलक्ष घनफूट नैसर्गिक गॅसचा पुरवठा शक्य होईल.

आज भारतात होणारी ऊर्जेची वाहतूक प्रामुख्याने समुद्री जहाजे आणि टँकरवर अवलंबून राहिली आहे. मात्र युद्ध, समुद्री अडथळे, चाचेगिरी किंवा सामरिक संघर्ष यांसारख्या कारणांमुळे या पुरवठा साखळीत व्यत्यय येण्याचा धोका सतत असतो. होर्मुज सामुद्रधुनीतील संकटामुळे याचा प्रत्यक्ष अनुभव आपण घेत आहोत.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या जागतिक पुरवठ्यात घट होऊन किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. याचा परिणाम भारतातील खतनिर्मिती उद्योग, वीज प्रकल्प आणि औद्योगिक क्षेत्रावर झाला आहे. ऊर्जा आयातीवरील खर्च वाढल्याने महागाईलाही चालना मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर ओमान-भारत वायूवाहिनी प्रकल्पाकडे नव्या दृष्टीने पाहायला हवे. पूर्वी अनेकदा चर्चेत आलेला हा प्रस्ताव आर्थिक, तांत्रिक आणि भू-राजकीय अडचणींमुळे रखडला होता. परंतु आता परिस्थिती बदलत आहे. समुद्रतळाशी खोलवर पाईपलाईन टाकण्याच्या तंत्रज्ञानात मोठी प्रगती झाली आहे. त्याचबरोबर जागतिक अस्थिरतेमुळे ऊर्जा सुरक्षेविषयीची राजकीय इच्छाशक्तीही अधिक दृढ झाली आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची अभियांत्रिकी गुंतागुंत. काही भागांत समुद्राची खोली साडेतीन किलोमीटरपर्यंत असल्याने ही पाईपलाईन जगातील सर्वाधिक खोल समुद्री वायूवाहिन्यांपैकी एक ठरू शकते. या तांत्रिक आव्हानांची प्राथमिक चाचणीही सुरू झाली असून, समुद्रतळावरील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रायोगिक पाईपलाईन टाकण्यात आली आहे. यशस्वी तांत्रिक पडताळणीनंतर विस्तृत व्यवहार्यता अहवाल तयार होणार असून, त्यानंतर वित्तपुरवठा, वायू पुरवठा करार आणि अंमलबजावणीविषयी औपचारिक चर्चा पुढे सरकू शकते.


ब्रिगेडियर हेमंत महाजन
निवृत्त

भारतासाठी या प्रकल्पाचे महत्त्व केवळ ऊर्जा पुरवठ्यापुरते मर्यादित नाही. हा प्रकल्प भारताच्या सामरिक स्वायत्ततेलाही बळकटी देणारा ठरू शकतो. कारण समुद्री जहाजे आणि टँकरवर अवलंबून असलेली ऊर्जा व्यवस्था युद्धकाळात किंवा जागतिक संकटांमध्ये सहज विस्कळीत होऊ शकते. थेट समुद्री वायूवाहिनीमुळे भारताला स्थिर, तुलनेने स्वस्त आणि दीर्घकालीन ऊर्जास्त्रोत उपलब्ध होऊ शकतो. विशेष म्हणजे हा मार्ग कोणत्याही तृतीय देशातून जात नसल्याने पाकिस्तान किंवा अफगाणिस्तानसारख्या अस्थिर भूभागांवरील अवलंबित्व पूर्णपणे टळणार आहे.

याआधी तुर्कमेनिस्तान-अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत वायूवाहिनी आणि इराण-पाकिस्तान-भारत प्रकल्प याच कारणांमुळे अपूर्ण राहिले. हे दोन्ही प्रकल्प भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात होते. मध्य आशिया आणि पश्चिम आशियातील प्रचंड नैसर्गिक वायू साठे थेट भारतीय बाजारपेठेशी जोडण्याची क्षमता या योजनांमध्ये होती. मात्र भू-राजकीय संघर्ष, दहशतवाद, भारत-पाकिस्तान तणाव, अमेरिकेचा दबाव आणि आर्थिक अनिश्चितता यामुळे हे प्रकल्प प्रत्यक्षात पूर्णत्वास जाऊ शकले नाहीत.

तुर्कमेनिस्तान-अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत वायूवाहिनी, म्हणजेच तापी प्रकल्पाची संकल्पना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आली. या प्रकल्पाचा उद्देश तुर्कमेनिस्तानमधील विशाल गाल्किनिश वायूक्षेत्रातील नैसर्गिक वायू अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमार्गे भारतापर्यंत आणणे हा होता. सुमारे अठराशे किलोमीटर लांबीच्या या पाईपलाईनद्वारे दरवर्षी अब्जावधी घनमीटर वायू भारताला मिळू शकला असता. पण एखाद्या राजकीय संघर्षाच्या वेळी पाकिस्तान पुरवठा रोखू शकतो, अशी भीती कायम होती. त्यामुळे भारताने या प्रकल्पाकडे सावध भूमिकेतून पाहिले.

इराण-पाकिस्तान-भारत, म्हणजेच आयपीआय प्रकल्पाची कथा देखील जवळपास अशीच आहे. या प्रकल्पाला एकेकाळी शांतता पाईपलाईन असेही म्हटले जात होते. कारण भारत, पाकिस्तान आणि इराण यांच्यात ऊर्जा सहकार्याद्वारे स्थैर्य निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. या योजनेनुसार इराणच्या दक्षिण पार्स वायूक्षेत्रातील नैसर्गिक वायू पाकिस्तानमार्गे भारतात आणला जाणार होता. इराणकडे जगातील सर्वात मोठ्या नैसर्गिक वायू साठ्यांपैकी एक साठा आहे. त्यामुळे भारतासाठी हा प्रकल्प अत्यंत फायदेशीर ठरू शकला असता. मात्र येथेही पाकिस्तान हा संक्रमण देश असल्याने सुरक्षा आणि राजकीय विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण झाला. भारताची नैसर्गिक वायूची मागणी आगामी दशकात झपाट्याने वाढणार आहे. औद्योगिकीकरण, शहरांतील वायूजाळ्यांचा विस्तार, स्वच्छ ऊर्जेकडे होणारी वाटचाल आणि खतउद्योगाची वाढती गरज यामुळे वायू वापरात मोठी वाढ अपेक्षित आहे. अशा वेळी दीर्घकालीन आणि स्थिर पुरवठा साखळी उभारणे अपरिहार्य ठरणार आहे. ओमान-भारत समुद्री वायूवाहिनी हा त्यासाठीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीने भारताला एक महत्त्वाचा धडा दिला आहे तो म्हणजे ऊर्जा सुरक्षेच्या बाबतीत दीर्घकालीन नियोजनाला पर्याय नाही. त्यामुळे ओमानशी प्रस्तावित समुद्री वायूवाहिनी ही भारताच्या भविष्यातील स्थैर्याकडे नेणारी एक महत्त्वाची ऊर्जारेषा ठरू शकते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# बनावट घटस्फोटांचे वाढते प्रकार

सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या दोन निकालांनी काही महत्त्वाचे सामाजिक आणि कायदेशीर मुद्दे चर्चेत आणलेले आहेत. अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात निकाल देताना असे म्हटले की, गेल्या काही वर्षांमध्ये घटस्फोटांच्या घटना वाढत आहेतच. परंतु जाणीवपूर्वक काही प्रकरणं न्यायालयांमध्ये आणली जातात. ज्यामध्ये केवळ घटस्फोट होऊ घातलेल्या पतीकडून भरपूर पैसा उकळण्याचा उद्देश पाहायला मिळतो. अगदी लग्न झाल्यानंतर वर्ष सहा महिन्यातच जाणीवपूर्वक कुरबुरी सुरू केल्या जातात आणि अगदी सहा महिन्यातच घटस्फोटाची नोटीस देऊन मोठ्या रकमेची मागणी केली जाते. हे प्रकार गेल्या काही वर्षात संपूर्ण देशात सर्रासपणे वाढू लागले आहेत. घटस्फोटाला कोणतेही विशेष कारण नसताना केवळ पैसा उकळण्याचा उद्देश ठेवून ही प्रकरणं केली जात असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे. देशाच्या सर्वोच्च न्याय संस्थेने या संदर्भात अशा प्रकारचे स्पष्ट मत नोंदवावे याचा अर्थ न्यायालयासमोर येणाऱ्या अनेक प्रकरणांमध्ये घटस्फोटांची बनावट प्रकरणंही वाढीला लागल्याचे स्पष्ट होते. केवळ सामाजिकदृष्ट्या विचार केला तर ही अतिशय धक्कादायक बाब म्हणावी लागते. जिथे कुटुंब व्यवस्था टिकवून ठेवण्याचे काम विवाह संस्था करत आलेली आहे. परंतु आज ज्या पद्धतीचे विवाह घडून येतात आणि विवाहानंतरच्या तक्रारींचे स्वरूप ज्या पद्धतीने न्यायालयासमोर येते आहे त्यावरून अतिशय किरकोळ गोष्टी या घटस्फोटासाठी समोर आणल्या जातात. प्रामुख्याने मानसिक छळ किंवा शारीरिक छळाचे कारण सांगून घटस्फोटाची मागणी केली जाते. ही मागणी करत असताना घटस्फोट घेऊ इच्छिणाऱ्या महिलेकडून अव्वाच्या सव्वा नुकसान भरपाईची किंवा पोटगीची मागणी केली जाते आहे. हे प्रकार अलीकडच्या काळात खूप वाढत असल्याने बनावट घटस्फोटांचेही प्रमाण सातत्याने वाढीला लागल्याचे दिसते. हे प्रकार ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे त्यांच्या बाबतीत मोठ्या संख्येने होताना दिसतात. कारण व्यापारी, व्यावसायिक उद्योगपती यांच्याकडची लग्न ही धुमधडाक्यात होत असतात. प्रचंड पैसा खर्च करून लग्न पार पाडली जातात. मात्र लग्नानंतर त्यांच्यामध्ये ज्या तक्रारी किंवा कुरबुरी सुरू होतात त्या अतिशय दुर्दैवी स्वरूपाच्या ठरतात. त्यातून ही लग्न केवळ पैसे उकळण्यासाठीच केले गेले होते हे आपोआप स्पष्ट होऊ लागते.

**पैसे उकळण्याचा उद्देश**

न्यायालयाने या संदर्भात स्पष्ट मत नोंदवत असताना अशा घटस्फोटांच्या वाढत्या संख्येमुळे जी खरोखरच घटस्फोटांची गंभीर प्रकरणं असतात त्याकडे दुर्लक्ष होते. किंवा अशा घटस्फोटांच्या प्रकरणांकडे संशयाने पाहिले जाते आहे. न्यायालयाची ही भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. भारतीय समाज व्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा भाग असलेल्या कुटुंब व्यवस्थेला त्यातून मोठे धोकेही निर्माण होत आहेत. विवाह हा एक संस्कार मानण्याची परंपरा ज्या संस्कृतीत आहे, त्या संस्कृतीलादेखील बदनाम करण्याचे कारस्थान यानिमित्ताने पुढे येते आहे. आजच्या बदलत्या काळात स्त्री स्वातंत्र्य म्हणा किंवा एकूणच पैसे कमावणाऱ्या महिलांची वाढलेली संख्या म्हणा. त्यांचा स्वाभिमानही त्यात गृहित धरलेला असतो. प्रत्येकाच्या जगण्याचा अधिकार मान्य करीत असताना जर एका विशिष्ट उद्देशाने आणि त्यातही पैसा उकळण्याचा उद्देश ठेवून हे प्रकार वाढीला लागले असतील तर यासंदर्भात अतिशय गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात व्यक्त केलेले मत हे सगळ्या समाजासाठी विचार करण्यासारखे आहे. शिवाय सरकारनेसुद्धा या संदर्भात लक्ष घालण्याची वेळ आलेली आहे. ज्याअर्थी सर्वोच्च न्यायालयाला हे प्रकरण गांभीर्याने घेण्याची आवश्यकता वाटली. यातूनच त्यातल्या गैरप्रकारांवर प्रकाश पडतो. मॅट्रिमोनियल बँक्वेट किंवा मॅरेज बँक्वेट नावाने हा सगळा पैसे वसुलीचा प्रकार सुरू आहे. ज्या कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली नसते त्यांच्यापर्यंतदेखील हे लोण पोहचते आहे. आणि घटस्फोटित मुलीच्या सगळ्या कुटुंबावर उद्ध्वस्त होण्याची वेळ येते. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकार करणाऱ्यांनाच उलट दंड ठोठावण्याची आवश्यकता आहे. तरच या वाढत्या विकृतीला रोखता येऊ शकेल.

**तारीख पे तारीख**

एकीकडे न्यायालयाने सामाजिक दृष्टीकोनातून या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घातले हे निश्चितच स्वागतार्ह आहे. त्याचबरोबर न्यायायल म्हटल्यावर तारीख पे तारीख हा प्रकार सातत्याने चालू राहतो. अनेक ठिकाणी दोन-दोन वर्षे न्यायालयांचे निकाल राखून ठेवले जातात. आणि या राखून ठेवलेल्या निकालांबाबत कोणताही निर्णय होत नाही. वारंवार तारखा दिल्या जातात. खरे तर राखून ठेवलेल्या निकालाबाबतही पुढच्या तीन महिन्यांमध्ये निर्णय घेण्याची कायदेशीर तरतूद आहे. परंतु तसे न करता देशभरातल्या अनेक न्यायालयांत दोन-दोन वर्षे निकाल राखून ठेवण्याची एक विचित्र पद्धत रूढ झालेली पाहायला मिळते. सर्वोच्च न्यायालयाने याचीसुद्धा दखल घेतली आणि देशभरात अशी किती प्रकरणं आहेत याचीही माहिती मागवली. निर्णय घेण्याची टाळाटाळ करून संबंधित पक्षकाराला मानसिक, शारीरिक आणि आर्थिक छळ करण्याचा प्रकार घडतो. कधी साक्षीदार नसतो. कधी साक्षीदार उलटलेला असतो. तर कधी पुरावे गोळा केले जात नाहीत. अशा अनेक कारणांवरून खटले लांबतच राहतात. एकूणच न्यायालयीन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ही बाब ठरते. या दोन्ही प्रकरणांबाबत समाज व्यवस्थेला वेठीला धरण्याचा आणि वारंवार तारखा देऊन न्यायालयीन प्रक्रिया अडचणीत आणण्याचा प्रकार घडतो. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात घेतलेली भूमिका ही अतिशय पारदर्शक आणि समाज व्यवस्थेला मजबूत करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरते. सामाजिक स्तरावर घडणाऱ्या या घटना व्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या कशा ठरतात हे या दोन्ही गोष्टींमधून स्पष्ट होते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

शब्दात परकेपणाचा गंध आला की, समजून जायचं की मायेची फुलपाखरं आधीच उडून गेली आहेत.

## पंचांग

**रविवार, ३१ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** अधिक ज्येष्ठ पौर्णिमा**
**नक्षत्र : अनुराधा**



**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-११**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० वृश्चिक**

**पौर्णिमा समाप्ती दुपारी २.१४, जागतिक तंबाखू विरोधी दिन, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जन्मदिन**

## पाककृती



### महालाबिया



★ **साहित्य :** दूध - ४ कप, फ्रेश क्रीम - १२५ ग्रॅम, कॉर्नस्टार्च - १/२ कप, ऑरेंज इसेन्स - १ टीस्पून, बटर (मीठ नसलेले), रोझ सिरप - २ चमचे, वेलची पावडर पाव टीस्पून, पिस्ता - १/२ कप. सजवण्यासाठी गुलाबाच्या पाकळ्या.

★ **कृती :** सर्वप्रथम गॅस पेटवून त्यावर एक पॅन ठेवा. त्यात दूध घालून गरम करायला ठेवा. आता क्रीम आणि कॉर्नस्टार्च एका भांड्यात मिक्स करून घ्या व ते गरम करायला ठेवलेल्या दुधात ओता. हे मिश्रण मध्यम आचेवर उकळा. हे मिश्रण ढवळत राहा. चांगले उकळले की, त्यात साखर घाला. घट्ट झाल्यावर गॅस बंद करा आणि एका भांड्यात काढा. नंतर त्यात गुलाब सरबत, वेलची पूड आणि ऑरेंज इसेन्स टाका. त्यामुळे त्याचा सुगंध घरभर पसरेल. आपला महालाबिया तयार आहे. हे मिश्रण २ तासासाठी फ्रीजमध्ये ठेवून द्या. यानंतर पॅनमध्ये बटर घालून टॉपिंगसाठी गरम करा. त्यात पिस्ता आणि साखर घालून तळून घ्या आणि साखर वितळली की गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या.

खायला देताना महालाबियावर पिस्ताचे टॉपिंग तुकड्यांनी सजवा. आता तुमची स्वादिष्ट महालाबिया तयार आहे, थंडगार सर्व्ह करा.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in

**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.

Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



## क्रीडा

# आज आयपीएल स्पर्धेचा महाअंतिम सामना

## गुजरात संघाची गतविजेता बंगळुरूशी गाठ

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर उद्या रविवारी आयपीएलचा महाअंतिम सामना होणार आहे. या सामन्यात गुजरात टायटन्स आणि गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आमनेसामने येणार असून, आयपीएलचे दुसऱ्यांदा विजेतेपद पटकाविण्यासाठी दोन्ही संघ सज्ज झाले आहेत. त्यासाठी दोन्ही संघांतील खेळाडूंनी कसून सराव केला.**




■ अहमदाबाद

**आयपीएलच्या** या हंगामात झालेल्या तीन सामन्यांमध्ये बंगळुरुने दोन आणि गुजरातने एका सामन्यात विजय मिळवला आहे. आयपीएलच्या क्वालिफायर १ मध्ये बंगळुरुने गुजरातचा पराभव करून अंतिम सामन्यामध्ये धडक मारली. तर क्वालिफायर २ मध्ये गुजरातने राजस्थानवर विजय मिळवून अंतिम सामन्यामध्ये प्रवेश केला आहे.

दोन्ही संघ आपल्या विजयी संघात बदल करण्याची कोणतीही शक्यता नाही, मात्र गुजरातचा कर्णधार गिल एक बदल करू शकतो. निशांत सिंधूला सातत्याने संधी दिली आहे. मात्र त्याने निराशाजनक कामगिरी केली आहे. त्याच्या जागी गिल स्फोटक शाहरुख खानची जागा घेऊ शकतो. गुजरातच्या उर्वरित संघात बदल होण्याची शक्यता कमी आहे. संघ राहुल तेवतिया आणि मोहम्मद सिराज यांचा प्रभाव टाकणारे खेळाडू म्हणून वापर करू शकतो. गिल आणि सुदर्शन डावाची सुरुवात करतील, तर जोस बटलर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. वॉशिंग्टन सुंदर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीची जबाबदारी घेऊ शकतो. त्यांच्यापाठोपाठ शाहरुख खान, राहुल तेवतिया, जेसन होल्डर आणि रशीद खान मधल्या आणि खालच्या फळीला बळकटी देतील. गोलंदाजी प्रामुख्याने कागिसो रबाडा, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि रशीद खान यांच्यावर अवलंबून असेल.

बंगळुरुसाठी फिल सॉल्टची दुखापत एक चिंतेची बाब आहे. सॉल्ट सामना खेळण्यासाठी तंदुरुस्त आहे की नाही हे अस्पष्ट आहे. जर तो परतला, तर बंगळुरुच्या स्फोटक फलंदाजीला बळ मिळेल. जर तो परतला नाही, तर संघाला पुन्हा व्यंकटेश अय्यर आणि विराट कोहली या सलामीच्या जोडीवर अवलंबून राहावे लागेल. शिवाय, बंगळुरु आपल्या अंतिम ११ खेळाडूंमध्ये कोणताही बदल करू इच्छिणार नाही. देवदत्त पडिक्कल तिसऱ्या क्रमांकावर, तर रजत पाटीदार चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येईल. मधल्या आणि खालच्या फळीत संघात कृणाल पांड्या, टिम डेव्हिड आणि जितेश शर्मा यांच्यासारखे स्फोटक फलंदाज आहेत. भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड, जेकब डफी आणि रसिक सलाम यांच्यावर गोलंदाजीची जबाबदारी असेल. संघ रोमारियो शेफर्डचा प्रभावी खेळाडू म्हणून उपयोग करू शकतो.

## खो-खो स्पर्धेत ज्ञानविकास स्पोर्ट्स व छत्रपती व्यायाम मंडळ अंतिम फेरीत

■ सोलापूर


**राज्य** निमंत्रित महिलांच्या खो-खो स्पर्धेत ठाण्याचे ज्ञानविकास स्पोर्ट्स फाऊंडेशन व धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने अंतिम फेरीत प्रवेश केला. कबड्डीमध्ये स्वराज्य स्पोर्ट्स क्लब मुंबई उपनगर, आनंदवन महिला संघ गंगाखेड (परभणी), बारामती स्पोर्ट्स क्लब व प्रोग्रेस अकॅडमी सांगली या संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा सोलापूर जिल्हा कबड्डी व खो-खो असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित केली. खो-खो स्पर्धेतील उपांत्य सामन्यात दिव्या गायकवाड (४, २. ४० मि. व ३ गुण), धनश्री कंक (१.५० मि. व ४ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीमुळे ज्ञानविकास स्पोर्ट्स फाऊंडेशनने ठाण्याच्याच शिवभक्त क्रीडा मंडळाचा १५-१३ असा पराभव केला. मध्यंतराची ७-४ ही आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. शिवभक्तकडून रेश्मा राठोड (२.००, २. १० मि. व २ गुण) हिची लढत अपुरी ठरली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात धाराशिवने रत्नागिरीच्या आर्यन स्पोर्ट्स क्लबवर ११-६ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळवला.

## रिवाझ आयसीसीच्या स्वतंत्र संचालकपदावर

■ दुबई

**आयसीसीच्या** संचालक मंडळावर डॉ. रॉस सी. रिवाझ यांची स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या सुरुवातीला ३ वर्षांच्या कालावधीसाठी संचालक मंडळात सामील होणार असून, हा कालावधी जास्तीत जास्त आणखी तीन वर्षांसाठी वाढवला जाऊ शकतो. रिवाझ सध्या अँगलियन वॉटरचे अध्यक्ष आणि युरोप-स्थित मटेरियल सायन्स कंपन्या, अपेरम एसए व व्हिक्ट्रेक्स पीएलसी येथे प्रमुख स्वतंत्र संचालक आहेत, त्यांना यूके आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर, दोन्ही ठिकाणी ब्लू चिप कंपन्यांमध्ये कार्यकारी पदांचा अनुभव आहे.



## कुस्तीपटू विनेश फोगाटचे स्वप्न भंगले आशियाई क्रीडा स्पर्धेचे तिकीट हुकले

■ नवी दिल्ली

**भारतीय** महिला कुस्तीपटू विनेश फोगटचे आशियाई क्रीडा स्पर्धेत स्थान मिळवण्याचे स्वप्न निवड चाचणीच्या उपांत्य फेरीत भंगले. नवी दिल्लीत आज झालेल्या निवड चाचणीतील ५३ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात युवा कुस्तीपटू मीनाक्षी गोयतने तिला ६-४ ने पराभूत करून स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला. या पराभवामुळे ३१ वर्षीय विनेशने आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या भारतीय संघातील स्थान गमावले.

नवी दिल्लीत इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडलेली ही निवड पात्रता फेरी विनेशसाठी कमालीची नाट्यमय ठरली. उपांत्यपूर्व फेरीत हरियाणातील निशू विरुद्ध खेळताना विनेश एकावेळी ०-५ अशी मागे होती, तिथे प्रचंड गदारोळ पाहायला मिळाला. या सामन्यादरम्यान प्रशिक्षक आणि भारतीय कुस्ती महासंघाच्या अधिकाऱ्यांमध्ये तीव्र वाद झाले. या सर्व मानसिक दबावातून मार्ग काढत विनेशने उपांत्य फेरी गाठली खरी. मात्र मीनाक्षीविरुद्धच्या सामन्यात तिची झुंज अपयशी ठरली आणि तिचे आशियाई क्रीडा स्पर्धेचे तिकीट हुकले. काही निवड चाचण्यांत सहभागी न झाल्यामुळे तिला भारतीय कुस्ती महासंघाने आशियाई क्रीडा निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होण्यास मनाई केली होती. त्यानंतर हा वाद हायकोर्टातून सुप्रीम कोर्टात गेला. त्यानंतर काल सुप्रीम कोर्टाने तिला दिलासा देत निवड चाचणीत सहभागी होण्याची परवानगी दिली होती.

## चाहत्यांनो माफ करा वैभव सूर्यवंशी भावूक

■ चंडीगड

**आयपीएलच्या** क्वालिफायर २ सामन्यात राजस्थानचा पराभव झाल्यानंतर वैभव सूर्यवंशीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून एक भावुक पोस्ट शेअर केली. वैभव सूर्यवंशीने लिहिले की, मला अजूनही विश्वास बसत नाही, २० षटकात सर्वकाही कसे बदलू शकते. आजची रात्र खूप दुःख देणारी आहे. राग आहे नाराजी आहे आणि बरेच काही आहे. शुभमन गिल आणि गुजरात टायटन्सला विजयाचे श्रेय द्यायला हवे, त्यांनी खरच चांगला खेळ केला. मी सर्वांचे आभार मानतो, ज्यांनी माझ्या संघावर विश्वास दाखवला, आमच्यासोबत उभे राहिले आणि सर्व १६ सामन्यांमध्ये आम्हाला पाठिंबा दिला. आमच्याकडे आभार मानायला शब्द नाहीत. आम्हाला माफ करा, वाईट वाटत आहे, आम्ही तुम्हाला ते देऊ शकलो नाही ज्याचे तुम्ही हकदार आहात. आम्ही तुम्हाला निराश केले.

## फ्रेंच ओपनच्या तिसऱ्या फेरीत नोव्हाक जोकोविच पराभूत

■ पॅरिस

२४ ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा मानकरी असलेला सर्बियन दिग्गज नोव्हाक जोकोविच तरुण ब्राझिलियन खेळाडू जाओ फोन्सेकाकडून पराभूत होऊन तिसऱ्या फेरीतच फ्रेंच ओपन स्पर्धेतून बाहेर पडला.

रोलँड गॅरोस कोर्टवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात जोकोविचने शानदार सुरुवात करत पहिले दोन सेट्स ६-४, ६-४ असे जिंकले. अनुभवी खेळाडू सहजपणे पुढच्या फेरीत पोहोचेल असे वाटत होते. यानंतर सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटले. फोन्सेकाने जबरदस्त पुनरागमन करत पुढचे तीन सेट्स ६-३, ७-५ आणि ७-५ असे जिंकले आणि पाच सेट्सच्या या सामन्यात एक मोठी उलथापालथ घडली. यावर्षी जोकोविचकडे इतिहास रचण्याची सुवर्णसंधी होती. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या यानिक सिनरने स्पर्धेतून आधीच माघार घेतली होती, तर गतविजेता कार्लोस अल्काराझ दुखापतीमुळे सहभागी होऊ शकला नाही. अशा परिस्थितीत जोकोविच विक्रमी २५ वे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावू शकेल, असा विश्वास होता. पण फोन्सेकाकडून झालेल्या पराभवामुळे ही आशाही संपुष्टात आली.



## महापौर खो-खो स्पर्धा! पुरुष गटात सेंट्रल रेल्वे-मुंबई पोलीस लढणार

■ मुंबई

**मुंबई** खो-खो संघटनेच्या वतीने दादरच्या शिवाजी पार्क येथे सुरू असलेल्या मुंबई महापौर चषक खो-खो स्पर्धेत पुरुष, महिला आणि व्यावसायिक गटातील उपांत्य फेरीचे सामने झाले. अंतिम फेरीत पुरुष गटात शिर्सेकर्स महात्मा गांधी आणि श्री समर्थ व्यायाम मंदिर, महिलांमध्ये सरस्वती कन्या संघ आणि शिर्सेकर्स महात्मा गांधी व व्यावसायिक पुरुष गटात सेंट्रल रेल्वे आणि मुंबई पोलीस असे सामने रंगणार आहेत.

पुरुष गटाच्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात शिर्सेकर्स महात्मा गांधीने विद्यार्थी क्रीडा केंद्राचा १३-१० (मध्यंतर १३-५) असा एक डाव व ३ गुणांनी मोठा पराभव केला. या सामन्यात शिर्सेकर्स महात्माच्या रामचंद्र झोरे (२.१०, २.२० मि. संरक्षण), सुजल जयगाडे (३ मि. संरक्षण व १ गुण), धीरज भावे (२, १.२० मि. संरक्षण), अनिकेत पोटे (नाबाद १.४० संरक्षण व २ गुण), निहार दुबळे (४ गुण) अर्जुन आणि वसे अनीवसे (३ गुण) यांनी संघाला विजयाला गवसणी घातली. पुरुष गटाच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात श्री समर्थ व्यायाम मंदिरने सरस्वती स्पोर्ट्स क्लबचा (१९-१०) (मध्यंतर ९-६ गुण) असा ९ गुणांनी पराभव केला. या सामन्यात श्री समर्थच्या अक्षय खापरे (२.१० मि. संरक्षण व ७ गुण), हितेश आंग्रे (१.४०, २.४० मि. संरक्षण व ३ गुण), सुरज खाके (१.१०, नाबाद १ मि. संरक्षण व २ गुण) यश बोरकर (१.४०मि. संरक्षण व १ गुण) व वेदांत देसाई (१.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी विजय निश्चित केला.

देश विदेश

# राजस्थानात वाळूच्या वादळ! पाच जिल्ह्यांत दिवसा अंधार

■ जयपूर

**राजस्थानातील** अनेक भागांना आज वाळूच्या वादळाचा तडाखा बसला. श्रीगंगानगर, बिकानेर, चुरू, हनुमानगड आणि सीकर या पाच जिल्ह्यांमध्ये आलेल्या या वादळाचा सुमारे २०० चौरस किलोमीटरच्या परिसराला फटका बसला. वादळाचा वेग ताशी ६० ते ८० किलोमीटरपर्यंत पोहोचल्याने जनजीवन विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी दिवसा अंधार पसरल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली.



वाळूच्या वादळाची सुरुवात हनुमानगड आणि श्रीगंगानगर परिसरातून झाली. त्यानंतर ते वेगाने बिकानेर, चुरू, सीकर आणि आसपासच्या भागांमध्ये पसरले. धुळीचे आणि वाळूचे प्रचंड लोट उसळल्यामुळे दृश्यमानता मोठ्या प्रमाणात कमी झाली. विशेषतः श्रीगंगानगर आणि हनुमानगड दरम्यानच्या राज्य महामार्गावर दिवसा अंधार पडला. चुरू जिल्ह्यात तर वाळूची प्रचंड भिंत उभी राहिल्यासारखे दृश्य निर्माण झाले होते. वादळाच्या रौद्ररूपामुळे अनेक झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी वीजखांब कोसळल्याने वीजपुरवठाही विस्कळीत झाला.

दुपारी सुमारे १२.३० वाजता सूरगढ आणि आसपासच्या भागात वादळाचा प्रभाव अधिक तीव्र झाला. बिकानेर, श्रीगंगानगर, किरणपूर, गसिंहपूर आणि बिजवाल परिसरात जोरदार वाऱ्यांसह धुळीचे लोट, वाळू आणि काही ठिकाणी पावसाच्या सरी व गारपीटही झाली.

# भारतात माझे सर्वाधिक फॉलोअर! नेतन्याहूंचे वक्तव्य

■ तेल अवीव

**इस्त्रायलचे** पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी भारत-इस्त्रायल संबंधांबाबत मोठे विधान केले आहे. भारतात इस्त्रायलला प्रचंड पाठिंबा आणि प्रेम मिळत असल्याचे सांगताना, माझे सर्वाधिक सोशल मीडिया फॉलोअर्स भारतात आहेत असेही त्यांनी म्हटले.

वेस्ट बँकमध्ये आयोजित एका परिषदेत बोलताना नेतन्याहू म्हणाले की, जगातील अनेक भागांमध्ये इस्त्रायलला टीका आणि विरोधाचा सामना करावा लागतो. मात्र भारतात परिस्थिती पूर्णपणे वेगळी असून इस्त्रायलविषयी विशेष आपुलकी आहे. जगातील अनेक ठिकाणी आमच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित केले जातात, पण भारतात तसे नाही. भारतात इस्त्रायलसाठी जबरदस्त प्रेम आहे. भारत आणि इस्त्रायलचे संबंध जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि अद्वितीय आहे.

# शाओलिनच्या माजी प्रमुख भिक्षूला २४ वर्षांची शिक्षा

■ बीजिंग

**जगभरात** कुंग फू लोकप्रिय करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे चीनच्या शाओलिन मंदिराचे माजी प्रमुख भिक्षू शी योंगशिन यांना न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली २४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. त्यासोबत त्यांना ३५ लाख युआन (५,१६,००० अमेरिकन डॉलर्स) दंडही ठोठावला.

एकेकाळी चीनमधील सर्वात प्रभावशाली बौद्ध भिक्षूंपैकी एक मानल्या जाणाऱ्या ६० वर्षीय शी यांना, कर्तव्यभंग, निधीचा अपहार आणि लाचखोरी यांसारख्या गुन्ह्यांसाठी दोषी ठरवण्यात आले. बौद्ध तत्त्वांचे उल्लंघन केल्याबद्दल गेल्या वर्षी जुलैमध्ये त्या भिक्षूला बडतर्फ करून ताब्यात घेण्यात आले. ते १९९९ पासून शाओलिन मंदिराचे मठाधिपती होते आणि या संस्थेला जगभरात एका लोकप्रिय ब्रँडमध्ये रूपांतरित करण्यात त्यांच्या भूमिकेमुळे त्यांना सीईओ भिक्षू हे टोपणनाव मिळाले.इ.स. ४९५ मध्ये स्थापित झालेले हे मंदिर चीनच्या हेनान प्रांतातील साँग पर्वताच्या पायथ्याशी वसलेले आहे. न्यायालयाने असे आढळले आहे की, २००३ ते २०२५ या कालावधीत शी यांनी मंदिराचे मठाधिपती आणि शाओलिन धर्मादाय व कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष या पदांचा वापर करून १३१ दशलक्ष युआनपेक्षा जास्त रकमेचा अपहार केला.

# गोवा सरकार राज्यात लवकरच ‘वॉटर मेट्रो’ प्रकल्प राबविणार

■ पणजी

**केरळमधील** कोचीच्या धर्तीवर गोव्यात लवकरच ‘वॉटर मेट्रो’ प्रकल्प राबवण्यात येणार आहे. हा १११ किलोमीटर लांबीचा भव्य प्रकल्प राज्यातील अंतर्गत जलवाहतुकीला गती देईल, प्रवाशांचा प्रवास सुकर करेल आणि पर्यटनाला मोठ्या प्रमाणावर चालना देईल, असे मत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. दिल्ली दौरा आटोपून गोव्यात



परतल्यावर मुख्यमंत्री सावंत यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राज्यात सध्या दररोज ५० हजारांहून अधिक नागरिक फेरीबोटीने प्रवास करतात. या प्रकल्पामुळे राज्यातील जलवाहतूक क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा आणि बदल घडून येतील.

# यंदा सणासुदीच्या काळात स्मार्ट फोन विक्रीत घट होणार

■ नवी दिल्ली

**यंदा** पुढील सणासुदीच्या काळात देशातील स्मार्ट फोनच्या विक्रीमध्ये मोठी घट होण्याची शक्यता आहे. कारण सध्याच्या स्मार्ट फोनच्या वाढत्या किमतीचा सिलसिला सुरू राहिला तर ग्राहकवर्ग जुन्या स्मार्ट फोन खरेदीकडे वळण्याची शक्यता असल्याची माहिती ‘ट्रेकिन ट्रेक’ आणि ‘टेक आर्क’ यांच्या संयुक्त अहवालात नमूद करण्यात आली आहे.

या संयुक्त अहवालानुसार, यंदाच्या वर्षाच्या उत्तरार्धातील स्मार्टफोनची ५४ टक्के नियोजित मागणी सध्या धोक्यात आहे. जुलै ते डिसेंबर दरम्यान स्मार्टफोन खरेदीचे नियोजन करणाऱ्या देशभरातील ५,९५८ सक्रिय ग्राहकांचे सर्वेक्षण या अभ्यासात करण्यात आले.

# हडप्पाच्या शिक्क्यावरील शिव-पशुपती! अमेरिकन इतिहासकारांचा आक्षेप

■ वॉशिंग्टन

**मोहेंजो-दडो** येथे सापडलेल्या हडप्पाकालीन ‘पशुपती शिक्क्या’वरून नवा वाद निर्माण झाला आहे. अमेरिकन इतिहासकार ऑड्रे ट्रुश्के यांनी या शिक्क्यावरील आकृतीला ‘शिव-पशुपती’ मानण्यास आक्षेप घेतला. भारताच्या संस्कृती मंत्रालयाने हे नाणे भारतीय संस्कृतीच्या सातत्याचे प्रतीक असल्याचे म्हटले असताना, ट्रुश्के यांनी ही प्रतिमा प्रोटो-एलामाइट संस्कृतीशी संबंधित असू शकते, असा दावा केला.

वादाच्या केंद्रस्थानी असलेले हे शिक्का सुमारे ४३०० वर्षांपूर्वीचे मानले जाते. मोहेंजो-दडो येथे सापडलेल्या या शिक्क्यावर शिंग असलेली एक मानवी आकृती योगमुद्रेत बसलेली दिसते. तिच्या भोवती हत्ती, गेंडा, म्हैस यांसारखे प्राणी कोरलेले आहेत. अनेक वर्षांपासून काही इतिहासकार ही आकृती भगवान शिवाचे ‘पशुपती’ रूप असल्याचे मानत आले आहेत. संस्कृती मंत्रालयाने नुकत्याच केलेल्या पोस्टमध्ये हडप्पाकालीन ‘पशुपती’ शिक्क्याचा उल्लेख भारताच्या अखंड सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक म्हणून केला होता. अमेरिकन इतिहासकार ऑड्रे ट्रुश्के यांनी या दाव्याला विरोध करत, ही प्रतिमा हिंदू देवता शिवाची असल्याचा ठोस पुरावा नसल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, ही आकृती प्राण्यांचा स्वामी दर्शवणाऱ्या प्राचीन युरेशियन देवतेशी संबंधित असू शकते.

# सुरत-मंगळुरू विशेष ट्रेन आता कायमस्वरूपी होणार

■ सिंधुदुर्ग

**कोकण** रेल्वे मार्गावरून धावणारी सुरत ते मंगळुरू दरम्यान धावणारी विशेष ट्रेन आता कायमस्वरूपी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता ही गाडी 'सुरत - मंगळुरू जंक्शन - सुरत एक्स्प्रेस' १९०५७/१९०५८ या नवीन क्रमांकासह आठवड्यातून दोन दिवस धावणार आहे.

सुरतवरून ही सेवा ३ जूनपासून तर मंगळुरू जंक्शनवरून ४ जूनपासून सुरू होत आहे.यामुळे गुजरात, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या चार राज्यांना जोडणाऱ्या या मार्गावरील प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर आणि हक्काचा होणार आहे.या गाडीला एकूण २० डबे असणार आहेत. ही गाडी उधना, वलसाड, वापी, पालघर, वसई रोड, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर, वैभववाडी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, थिविम, मडगाव, कारवार, गोकर्ण रोड, कुमटा, मुरुडेश्वर, भटकळ, उडुपी आणि सुरतकल या प्रमुख स्थानकांवर थांबेल. १९०५७ सुरत ते मंगळुरू जंक्शन - दर बुधवार आणि रविवारी संध्याकाळी ७.३५ वाजता तर दुसऱ्या दिवशी रात्री ७.४५ वाजता तसेच १९०५८ मंगळुरू जंक्शन ते सुरत - दर सोमवार आणि गुरुवारी रात्री १०.३० वाजता - दुसऱ्या दिवशी रात्री ११.४५ वाजता सुटणार आहे.

# मणिपूरमध्ये ट्रक चालकाच्या हत्येच्या निषेधार्थ वाहतूक बंद

■ इंफाळ

**मणिपूरमध्ये** एका ट्रक चालकाच्या हत्येच्या निषेधार्थ शेकडो ट्रक चालकांनी आंदोलन छेडत राष्ट्रीय महामार्ग-३७ (इंफाळ-जिरीबाम मार्ग) वरील मालवाहतूक सेवा बंद केली हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी आणि महामार्गावर पुरेशी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी आंदोलक चालकांनी केली आहे.

उखरुल जिल्ह्यातील टीएम कासोम परिसरात संशयितांनी मालवाहू वाहनांच्या ताफ्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात पश्चिम बंगालमधील एका ट्रक चालकाचा मृत्यू झाला, तर एक पोलीस हवालदार जखमी झाला. या घटनेनंतर ट्रक चालकांमध्ये संतापाची लाट उसळली. आज पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील केइथेलमनबी येथे शेकडो ट्रक चालकांनी निदर्शने केली. एलपीजी टँकर, तेल टँकर आणि इतर मालवाहू वाहनांसह सुमारे ४०० ट्रक महामार्गालगत उभे करण्यात आले. मृत चालकाला श्रद्धांजली वाहत आंदोलकांनी मणिपूरमधील प्रमुख महामार्गांवर अधिक कडक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली.

# कांदा उत्पादकांच्या हक्कांसाठी २ जूनला मविआचा महामोर्चा

■ पुणे


**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाविकास आघाडीने २ जून रोजी कांदा उत्पादक शेतकरी क्रांती महामोर्चा आयोजित केला आहे. पुणे - नाशिक महामार्गावरील भोरवाडी येथील नंदी महाराज चौक, तांबडेमळा येथे सकाळी ९.३० वाजता या मोर्चाला सुरुवात होणार आहे. या महामोर्चात महाविकास आघाडीतील प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

कांद्याला किमान २५ रुपये प्रतिकिलो हमीभाव जाहीर करावा. यापूर्वी कमी दराने विक्री केलेल्या कांद्यासाठी शेतकऱ्यांना १५ ते २० रुपये प्रतिकिलो अनुदान द्यावे. नाफेडमार्फत थेट बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी सुरू करावी. ८ ते १० लाख टन कांदा खरेदी करावा.खरेदी केलेल्या कांद्याची देशांतर्गत विक्री न करता निर्यात करावी जेणेकरून बाजारभावाला आधार मिळेल.

**जाहिर निवेदन**

मी खालील सही करणार **सौ. जयश्री संतोष वाळुंज** वय ४१ वर्ष पत्ता: बिल्डीग नं . २१ए रूम न.५४६ सिजिएस कॉलनी काणे नगर अँन्टाप हिल मुंबई ४०००३७ येथे राहत असुन मी मुंबई सहारा को ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेत संचालक पदावर कार्यरत होती पण मी दिनाक ०१/०५/२०२६ रोजी सहखुशिने राजीनामा दिला आहे. या पुढे मुंबई सहारा को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मध्ये माझा कोणताही संबंध नाही या बद्दल काहीही म्हणणे असल्यास संस्थेचे अध्यक्ष श्री. रज्जाकअली शेख मो. ९९२०९२३२८८ यांस संपर्क करावा.

सही/-
सौ. जयश्री संतोष वाळुंज
मो. ८४१९९७४०८८



नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडभोवती पालिका ६ हजार झाडे लावणार

मुंबई

**हायकोर्टाने ताशेरे ओढताच घेतला निर्णय**

**हरित** पट्टा तयार करण्यासाठी आणि दुर्गंधीसह प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेने कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडच्या सभोवतालच्या १ लाख चौरस मीटर जमिनीवर तब्बल ६ हजार झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. हे वृक्षारोपण जून महिन्यात जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केले जाणार आहे.

अलिकडेच मुंबई उच्च न्यायालयाने कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडमधील वाढते प्रदूषण आणि दुर्गंधीच्या समस्येबाबत पालिकेच्या चालढकल धोरणावर चांगलेच ताशेरे ओढले होते. त्यानंतर न्यायालयाने नियुक्त केलेल्या देखरेख समितीने जागेला भेट दिली होती. या भेटीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पालिका कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंड भोवती काही विशेष प्रकारची झाडे लावणार आहे.

या ठिकाणी प्रामुख्याने प्रदूषण सहन करू शकणाऱ्या आणि कमी देखभालीची गरज असलेल्या स्थानिक प्रजातींच्या झाडांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये बाहेरील भागात उंच झाडे, मध्य भागात मध्यम उंचीची झाडे आणि आतील बाजूला दाट झुडपे लावली जाणार आहेत.

# पीओकेमध्ये तिरंगा का नाही? संघाने मोदींना सवाल करावा

**खासदार संजय राऊतांचे वक्तव्य**

मुंबई

**सरकारकडून** राज्याला वाऱ्यावर सोडून स्वतःच्या व्यवहारांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. मात्र, आम्ही यावर काही बोलणार नाही. कारण त्यामुळे महाराष्ट्राची बदनामी होईल. संघ आता मजबूत झाला आहे, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाकव्याप्त काश्मीरमध्ये झेंडा का फडकवला नाही, असा सवाल विचारायला हवा, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले.

विधान परिषदेच्या निवडणुकीवर राऊत म्हणाले की, विधान परिषदेच्या दोन जागांवर आमची चर्चा सुरू आहे. निवडणूक बिनविरोध होऊ नये यासाठी आम्ही निवडणूक लढवत आहे. स्वबळावर कोणीही निवडणूक जिंकू शकत नाही.



पुणे, पिंपरी चिंचवड येथे विषारी दारू प्यायल्यामुळे अनेकांचा मृत्यू झाला असून, आणखी काहींची प्रकृती गंभीर आहे. यावरून संजय राऊत म्हणले की, पुणे, पिंपरी-चिंचवड या भागामध्ये विषारु दारू प्यायल्याने १६ लोकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या काही काळापासून पुण्यामध्ये अवैध धंदे, गुन्हेगारीचा उद्रेक सुरू आहे. पुणे पोलीस आयुक्तांनी गुन्हेगारी वाढू नये म्हणून रात्री १० नंतर पुणे बंदचे आदेश काढले आहेत. कालच दारूकांड पाहिल्यावर मला असे वाटते की, पोलीस आयुक्तांना आता दिवसासुद्धा पुणे बंद करावे लागेल. पुण्यात विषारी दारू मिळते आणि लोक ती पित आहेत म्हणजे हे नेटवर्क संपूर्ण महाराष्ट्रात आहे. मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाने गेली ७ वर्षे हे नेटवर्क सुरू आहे.

# चंद्रपूरमध्ये माहेरी आलेल्या विवाहितेची घरात घुसून हत्या

चंद्रपूर

**चंद्रपूर** जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात माहेरी आलेल्या शीतल कुंभारे (३६) या विवाहितेची घरात घुसून धारदार शस्त्राने हत्या झाली. ही कोलिच्या धोपटाळा कामगार वसाहतीत घडली. या प्रकरणी राजुरा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शितल कुंभारे या उन्हाळी सुट्टीसाठी आपल्या लहान मुलीसह माहेरी धोपटाळा येथे आली होती. रात्री शितलची आई आणि भाऊ देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. त्यामुळे घरात शीतल आणि तिची लहान मुलगी दोघीच होत्या. दरम्यान, रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश केला. त्यावेळी मुलगी दुसऱ्या खोलीत झोपलेली होती. आरोपीने शीतलवर धारदार शस्त्राने हल्ला करत जखमी केले. त्यानंतर गळ्यावर चाकू फिरवून त्यांची हत्या केली. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

# गर्दीमुळे तुळजाभवानी मंदिरात १ ते ३ जूनला व्हीआयपी पास बंद



तुळजापूर

**राज्यातील** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर संस्थानने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शनिवार-रविवारच्या सुट्ट्या आणि त्यानिमित्ताने होणारी भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता १ जून ते ३ जून या कालावधीत व्हीआयपी दर्शन पास सुविधा तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या कालावधीत राज्यासह परराज्यांतून मोठ्या संख्येने भाविक तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. गर्दीचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि सर्वसामान्य भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी व्हीआयपी दर्शन पास बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेषतः शनिवार, रविवार, सुट्टीचे दिवस आणि धार्मिक उत्सवांच्या काळात दर्शनासाठी मोठ्या रांगा लागतात. त्यामुळे मंदिर प्रशासनाकडून गर्दी नियंत्रणासाठी विविध उपाययोजना केल्या जातात.

# कर्जतमधील पेज नदीत बुडून दोन तरुणांचा मृत्यू

रायगड

**कर्जत** तालुक्यातील पेज नदीपात्रात पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. कर्जत तालुक्यातील वारे येथील रहिवासी अजय म्हसे (३३) व त्याचा पुणे येथील मित्र सुनील प्रजापती (३५) हे दोघे अंजप परिसरातील पेज नदीपात्रात पोहण्यासाठी गेले होते. सायंकाळी पाचच्या सुमारास दोघेही नदीत उतरले. मात्र नदीतील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा योग्य अंदाज न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक लोकांनी मदतकार्य सुरू केले. नदीपात्रातून दोघांना अथक प्रयत्नानंतर बाहेर काढण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत झाले घोषित केले.

# ठाण्यातील काही भागांत ३ जूनला १२ तासांसाठी पाणीपुरवठा बंद



ठाणे

**ठाणे** महानगरपालिका आणि स्टेम प्राधिकरणाकडून पिसे उदंचन केंद्र तसेच टेमघर जलशुद्धीकरण केंद्रात पावसाळापूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांमुळे बुधवार, ३ जून रोजी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत ठाण्यातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेने दिली आहे.

महापालिकेच्या स्वतःच्या पाणीपुरवठा योजनेतील पिसे उदंचन केंद्र आणि टेमघर जलशुद्धीकरण केंद्राच्या उच्चदाब उपकेंद्रामध्ये आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. या कामांमध्ये कंट्रोल पॅनलची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर ऑईल फिल्ट्रेशन तसेच अन्य तांत्रिक कामांचा समावेश आहे. ही कामे सकाळी ९ ते रात्री ९ या कालावधीत करण्यात येणार आहेत. या कामांसाठी ठाणे महापालिकेच्या स्वतःच्या पाणीपुरवठा योजनेसह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्राधिकरणाच्या पाणीपुरवठ्याचाही १२ तासांचा बंद घेण्यात येणार आहे.

# पुणे विमानतळावर बॉम्बची धमकी विमानाच्या प्रसाधनगृहात चिठ्ठी

पुणे

**पुणे** आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुवाहाटीला जाणाऱ्या विमानाच्या प्रसाधनगृहात बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारी चिठ्ठी सापडल्याने खळबळ उडाली. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विमानतळावरील अधिकारी विशालकुमार श्रीवास्तव (३०) यांनी तक्रार केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे पावणेसात वाजताच्या सुमारास गुवाहाटीला जाणाऱ्या विमानाची नियमित सुरक्षा तपासणी सुरू होती. यावेळी विमानातील प्रसाधनगृहाची पाहणी करताना तेथे एक चिठ्ठी आढळली. या चिठ्ठीवर ठळक अक्षरांत 'बॉम्ब' असे लिहिलेले होते. चिठ्ठी सापडताच सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. विमानाची तपासणी करण्यात आली. परंतु यामध्ये कोणतीही बॉम्बसदृश किंवा संशयास्पद वस्तू सापडली नाही. मात्र यामुळे गुवाहाटीला जाणाऱ्या विमानाच्या उड्डाणास काही काळ विलंब झाला.

# नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स

**दर ३ महिन्यांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश**

मुंबई



**महाराष्ट्र** राज्यात एनईपी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० प्रभावीपणे लागू करण्यासाठी राज्य शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत विशेष राज्यस्तरीय टास्क फोर्स गठीत केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.नितीन करमळकर हे या ९ सदस्यीय टास्क फोर्सचे अध्यक्ष असणार आहेत. दर ३ महिन्यांनी अंमलबजावणीचा अहवाल सरकारला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

हा टास्क फोर्स नवीन ४ वर्षीय पदवी अभ्यासक्रम, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट, आणि क्रेडिट बँक प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणार आहे. तसेच नवीन अभ्यासक्रम राबवताना महाविद्यालय व विद्यापीठांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करणार आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ३५ हजारहून अधिक प्राध्यापकांना आवश्यक विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व कौशल्याधारित शिक्षण मिळण्याबाबत धोरणात्मक आराखडा तयार करणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट असणार आहे. टास्क फोर्सचे अध्यक्ष माजी कुलगुरू करमळकर यांच्यासह समितीमध्ये मुंबई विद्यापीठ, जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश आहे. उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण संचालक, निवृत्त प्राचार्य डॉ. अनिल राव आणि शैक्षणिक तज्ज्ञ भारत अमळकर हे देखील या समितीचे सदस्य असून, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू या समितीचे सदस्य-सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

# टीसीएस अत्याचार प्रकरणी सुनावणी पुढे ढकलली

नाशिक

**नाशिक** टीसीएस महिला अत्याचार आणि कथित धर्मांतरण प्रकरणातील आरोपी निदा खान, दानिश शेख आणि तौसिफ अत्तर यांच्या जामीन अर्जावर आज नाशिक रोड न्यायालयात सुनावणी होणे अपेक्षित होते. मात्र न्यायालयाने ही सुनावणी पुढे ढकलत १२ जूनला सुनावणी निश्चित केली आहे. या प्रकरणात सुमारे आठ दिवसांपूर्वीच आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर जामीन अर्जावर सुनावणी होणार होती. मात्र काही कारणास्तव न्यायालयाने आजची सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, पुढील सुनावणीपर्यंत निदा खानसह सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीतच राहावे लागणार आहे. या प्रकरणाकडे स्थानिक पातळीवर मोठे लक्ष लागले असून, १२ जून रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष आहे.

# 'एनटीए'च्या सीयुईटी परीक्षेत तांत्रिक बिघाडामुळे उशीर

नवी दिल्ली

**राष्ट्रीय** चाचणी संस्था (एनटीए) आयोजित सीयुईटी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रन्स एक्झाम) २०२६ परीक्षेला आज तांत्रिक बिघाडाचा फटका बसला. परीक्षा घेणारी भागीदार संस्था टीसीएसच्या प्रणालीमध्ये आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे देशातील काही परीक्षा केंद्रांवर परीक्षेला उशीर झाला. यासंदर्भात एनटीएने एक्स पोस्ट करून माहिती दिली.

एनटीएने जारी केलेल्या माहितीनुसार, ३० मे रोजी काही केंद्रांवर सकाळच्या सत्रातील परीक्षेच्या सुरुवातीस तांत्रिक समस्या निर्माण झाली होती. ही समस्या आता पूर्णपणे दूर करण्यात आली असून, कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. तसेच सकाळच्या सत्रातील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पूर्ण वेळ देण्यात आला आहे. तसेच परीक्षा पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना केंद्रातून बाहेर जाण्याची परवानगी देण्यात आली नव्हती. तर दुपारच्या सत्राच्या वेळेतही बदल केला. सुधारित वेळापत्रकानुसार उमेदवारांना दुपारी अडीच वाजताच्या सुमारास परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात आला तर परीक्षा दुपारी ३ ऐवजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास सुरू झाली.

याआधीही एनटीएने ईद-उल-अजहा निमित्त २८ मे रोजी अनेक भागांत सार्वजनिक सुट्टी जाहीर झाल्यामुळे सीयुईटी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल केला होता.

# मूळ कागदपत्रांशिवायही अकरावीला प्रवेश मिळणार

पुणे

**राज्य** मंडळाच्या दहावीच्या निकालानंतर अद्याप विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका व शाळा सोडल्याचे दाखले (एलसी) मिळाले नसतानाही अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेला अडथळा येऊ नये, यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विद्यार्थ्यांना हमीपत्राच्या आधारे प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या संदर्भातील परिपत्रक विभागीय शिक्षण उपसंचालकांना पाठवले आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू असून २१ मेपासून पहिल्या नियमित फेरीला सुरुवात झाली आहे. २९ मे रोजी या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली.

# आता सर्वोच्च न्यायालयातही होणार विशेष लोकअदालत



छत्रपती संभाजीनगर

**सर्वोच्च** न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा सलोख्याने आणि संमती-आधारित निपटारा करण्यासाठी २१, २२ आणि २३ ऑगस्ट रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय विधिक सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार 'समाधान समरोह २०२६' या मोहिमेचा हा मुख्य समारोप कार्यक्रम आहे. तरी पक्षकार आणि वकिलांनी आपली सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यासाठी ३१ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या विशेष लोक अदालतमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष गुगल लिंक किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरून अर्ज भरता येणार आहे. या लोकअदालतीत पक्षकारांना आभासी पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा देण्यात आली आहे. ३१ मे पर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. या विशेष लोकअदालतीत सहभागी होण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गिरीश अग्रवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आपल्या जिल्ह्यातील विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'शिवसागर'ने गाठला तळ बोट वाहतूक पूर्णपणे बंद

**जावळी** - तालुक्यातील बामणोली परिसरातील शिवसागर जलाशयाने तळ गाठल्याने कोयना विभागातील जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. जलाशयातील पाण्याची पातळी घटल्याने बोट वाहतूक पूर्णपणे बंद पडली आहे. त्यामुळे कोयना भागातील गावांतील नागरिकांना दळणवळणासाठी लोकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः बामणोली, तापोळा आणि शेंबडी परिसरातील बोट वाहतूक पूर्णपणे बंद पडल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यटन व्यावसायिक अडचणीत आले आहेत. कोयना धरणाची पाणी साठवण क्षमता सुमारे १०५ टीएमसी इतकी आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरते त्या काळात हा परिसर निसर्गसौंदर्याने बहरलेला दिसतो. मात्र दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात पाण्याची पातळी घटू लागल्यानंतर शिवसागर जलाशयाचे चित्र पूर्णपणे बदलते.

# मोफत गणवेश योजनेत बदल महिला बचत गटांना शिलाईचे काम



मुंबई

**राज्यातील** शासकीय आणि जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या मोफत गणवेश योजनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. गणवेशाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. नव्या नियमानुसार, १०० टक्के पॉलिस्टर कापड वापरण्यास बंदी घालण्यात आली असून, पॉलिस्टरसह कॉटन किंवा व्हिस्कोस मिश्रित (७०:३० किंवा ८०:२० प्रमाणात) कापड वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश देणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच गणवेश शिवण्याचे काम स्थानिक महिला बचत गटांना देण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

गणवेशाची गुणवत्ता राखण्यासाठी त्रिस्तरीय तपासणी लागू करण्यात आली आहे. केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावर तपासणी होणार असून, कापडाचे नमुने प्रयोगशाळेतही तपासले जाणार आहेत. निकृष्ट दर्जा आढळल्यास संबंधितांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. ही योजना 'समग्र शिक्षा' आणि राज्य सरकारच्या निधीतून राबवली जाते. अधिक चांगल्या दर्जासाठी शाळांनी सीएसआर किंवा इतर माध्यमांतून अतिरिक्त निधी उभारण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र सह्याद्री साप्ताहिक सोडत
ड्रॉ हर सोमवार से रविवार
जीते जीते
मे महिने में इनामों का वर्षाव
पहला इनाम ₹ 10000
टिकट ₹15/-
महाराष्ट्र विजयालक्ष्मी
ड्रॉ दि.27/05/2026 विजेता टिकट क्र: SV-04-4589
स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेता और विक्रेता का हार्दिक अभिनंदन!

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात साक्ष बदलण्यासाठी साक्षीदाराला धमकी

बीड

**पोलीस ठाण्यात तक्रार दाखल**

**बीडच्या** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील साक्षीदार दादा खिंडकर याला धमकी देण्यात आली आहे. साक्ष देऊ नये आणि प्रकरण मिटवून टाकावे, असा दबाव टाकत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप त्याच्या सख्ख्या लहान भावावर करण्यात आला आहे. या प्रकरणी बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.


संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांचे साडू दादा खिंडकर हे या प्रकरणातील कायदेशीर प्रक्रियेत सक्रिय आहेत. दादा खिंडकर हे आपल्या घरी असताना त्यांचा लहान भाऊ समाधान खिंडकर तेथे आला. जुन्या वादाची कुरापत काढत त्याने दादा खिंडकर यांना संतोष देशमुख प्रकरणात साक्ष देऊ नये तसेच हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी धनंजय देशमुख यांना सांगावे असा इशारा दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यावेळी दादा खिंडकर यांनी, तुला याच्याशी काय करायचे आहे? तू तुझे काम कर असे उत्तर दिले. त्यानंतर समाधान खिंडकर याने शिवीगाळ करत धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदार दादा खिंडकर आणि आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांमध्ये गेल्या काही काळापासून कौटुंबिक व अन्य कारणांवरून वाद सुरू आहेत.

यापूर्वी काही तरुणांना मारहाण केल्याप्रकरणी दादा खिंडकर यांच्यावरही गुन्हा दाखल आहे. पण हत्या प्रकरणातील साक्षीदाराला साक्ष बदलण्यासाठी किंवा साक्ष देऊ नये यासाठी दबाव टाकल्याचा आरोप थेट सख्ख्या भावावर झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
MAHARASHTRA STATE LOTTERY
महाराष्ट्र साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते शनिवार
MAHARASHTRA WEEKLY LOTTERY
जिंकले जिंकले
मे महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले सामाईक बक्षीस ₹ 7 लाख
तिकीट ₹ 50/-
तिकीटे प्रिन्स एजन्सी, मुंबई यांच्या मार्फत विकले गेले
महाराष्ट्र महाराष्ट्रलक्ष्मी
सोडत दि.30/05/2026 विजेता तिकीट क्र: ML-03-2121
स्टॉकिस्ट: प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोर्स, कल्याण
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गजलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
मे महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले सामाईक बक्षीस ₹ 10000
तिकीट ₹ 20/-
महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि
सोडत दि.24/05/2026 विजेता तिकीट क्र: GL-03-6076
स्टॉकिस्ट: सुमित एजन्सी, मुंबई
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

# नवाकाळ शब्दकोडे-१६२२



**आडवे शब्द –**

२. कुडता ४. संन्यासी, यती ६. श्रीकृष्णाने लहानपणी उचललेला पर्वत ९. लोटा, तांब्या ११. थोडक्यात न बोलणे, पाल्हाळ १२. एखादे काम हमखास पार पाडण्याचे कौशल्य १३. बोध, आकलन १४. कर्जापोटी सावकाराकडे ठेवलेली वस्तू १५. खाणीत मिळणाऱ्या वस्तू १७. बहरणे, फुलणे १९. कुमक, साह्य २१. पार्वती, उमा २२. शस्त्राची मूठ २५. कागद डकवण्यासाठी कणकेपासून केलेला पदार्थ २७. माळ, बरोबरी २८. भयभीत ३१. हंगाम, फुलोरा ३२. सुंदर हस्ताक्षराचे वर्णन ३४. मजुरांवर देखरेख ठेवणारा ३६. दलदल ३७. रांजण ३८. निगरगट्ट ३९. चोळीचे कापड ४०. वाईट कृत्य ४१. बुटका ४२. भ्रामक ४३. माळ ४४. सुगंधी उटी, उटणे ४७. सरपणाचे दुकान ४९. प्रणाम ५२. किनारा ५३. रंगवून केलेले वर्णन ५६. धनी, स्वामी ५७. कठोर शब्दात टीका ५८. यातून रोप अंकुरते ६०. शाश्वत, टिकणारा ६१. पृथ्वी ६२. करमणूक करणारे ६४. संगोपन ६६. आय, उत्पन्न ६७. सूड ६९. शपथ, आण ७१. वर्षाव, भडिमार ७३. वानराची मादी ७४. जुगार ७५. निशा, रात्र ७६. सहा मुखांचा देव ७८. प्रखर, उग्र ७९. निराळा, नामी ८०. आई, जननी ८१. युवती ८३. आवश्यकता ८४. मुंडण ८६. शाईची जुनी लेखणी ८७. मनाची अस्वस्थता ८९. चप्पल ९१. आक्रमण, चढाई ९२. फोटो, छायाचित्र ९३. कृत्रिम केशकलाप ९४. थंडावा देणारे ९६. वनात वावरणारा ९८. केविलवाणा, बापडा ९९. व्यर्थ, वाया १०१. अधाशी, वखवखलेला १०३. राजाचा अमात्य १०४. किल्ला १०५. त्वरित, ताबडतोब १०६. हस्त, हात १०७. आपली मायबोली १०८. ताजा, प्रफुल्लित १०९. समुद्र पिणारे ऋषी

**उभे शब्द –**

१. कांदा, कंदर्प २. दृढ, मजबूत ३. जलप्रवासाचे साधन, गलबत ४. चक्क्याचा गोड पदार्थ ५. पराभव ६. अनेक पाय असलेला एक कीटक ७. महिषी, म्हैस ८. रोख, कॅश ९. वगनाट्यात मध्यंतरापूर्वीचा भाग, पूर्वरंग १०. किराणा दुकानदार १३. कमी, वजा १६. स्वर्गलोक १८. पावसाळ्याच्या शेवटी पेरणी करून वसंत ऋतूत कापणीला आलेले पीक २०. मैत्रीण २२. उपरा, बाहेरचा २३. अकस्मात २४. सोन्याची नाणी २५. लहान खड्डा २६. चारा २७. समूह, गट २९. साहित्यिक ३०. तांबड्या रंगाचा ३१. मोठेपणाचा तोरा ३२. सागराच्या पोटातील अग्नी ३३. दृष्टांत, उदाहरण ३५. मजबूत ३८. दोन मैल अंतर ४०. बिचारा, बापडा ४२. जनावरांच्या अंगावरचे केस ४३. आदराची वागणूक ४५. जखमेतून वाहणारे रक्त ४६. सुगंध ४८. लोकसंख्येची मोजणी ५०. फुलातील रस, मध ५१. चूर्ण ५४. सूर्योदयाची वेळ, प्रभात ५५. भीती ५६. मृत्तिका ५७. तोरा, ऐट ५८. चर्चासत्राच्या आरंभी केलेले दिशादर्शक भाषण ५९. भरधाव, सुसाट ६१. जड ६३. तळे, तलाव ६५. एकमेव द्रवरूप धातू ६७. डाग, कलंक ६८. तपासणी करणारा ७०. डोंगराचा सुळका ७२. चातुर्य, शहाणपण ७४. उजळणी, अभ्यास ७७. मुंगूस ७८. पैठणीतले धागे ८०. हेतू, मनसुबा ८१. जुन्या काळातील प्रसिद्ध गायक- xxx मेहमूद ८२. मोजदाद ८३. विष ८५. अधोगती ८६. ज्वारीच्या पिकात माजलेले तण ८७. भेटवस्तू ८८. विजय तेंडुलकर यांचे गाजलेले नाटक- xxxx कोतवाल ९०. लोभी ९५. चाफ्याची एक टपोरी जात ९७. कंटाळवाणी गोष्ट ९८. एक आणि अर्धा १००. उसाचा रस आटवण्याची कढई १०३. अवस्था १०४. तुळई १०५. वसाहत, कॉलनी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. तबेला ४. शिष्टसंमत ७. पटांगण ९. तांदुळजा १०. पशू ११. फोलपट १३. तरतूद १५. फदफदे १८. मलई १९. नीर २०. मुळा २१. टरफल २३. टवळी २४. दैना २५. खटका २७. वरकड २९. झुणका ३१. थड ३३. खरा ३४. साथ ३६. रजनीकर ३९. मड्ड ४०. वीरश्री ४२. पुकारा ४३. बळकटी ४५. सम ४६. घासाघीस ४८. हमी ४९. दूर ५०. कागाळी ५१. सरी ५३. बुध ५४. वनमाळी ५६. हरकत ५८. वळकटी ६०. रेडा ६१. लाजरा ६३. वैरी ६४. सराई ६६. मेघ ६७. जमा ६८. कच्छ ६९. मतलबी ७१. श्वसन ७४. सुधा ७६. लगट ७८. नकील ७९. बरकत ८०. गनीम ८२. कामाक्षी ८३. तोरमल्ली ८५. लगबग ८७. स्वारी ८८. सडक ९१. फार ९३. पगार ९५. निराशा ९७. बटवा ९९. अलका १०१. जीत १०२. मनीषा १०३. रताळे १०५. डेरेदाखल होणे १०६. ऋणी १०७. दमदाटी १०८. भावी

**उभे शब्द** : १. थोतांड २. तळतळाट ३. बेजार ४. शिशू ५. संवाद ६. मलम ७. पटई ८. गहिनीनाथ १०. पदरव १२. पलटण १४. तूट १५. फलक १६. फट १७. देवयानी २०. मुखरा २२. फरक २६. कासावीस २८. डरकाळी २९. झुरळ ३०. कामटी ३२. डळमळीत ३३. खर्डेघाशी ३५. थर ३७. जरा ३८. कबर ४१. श्रीहरी ४४. कमान ४५. सगा ४७. घीवर ४९. दूध ५०. काळीज ५१. सतरा ५२. घोळ ५३. बुटी ५४. वडा ५५. मालामाल ५६. हरीतकी ५७. कसबी ५९. कष्ट ६०. रेघ ६२. राकट ६३. वैमनस्य ६५. ईश्वर ६६. मेधा ७०. ललकारी ७२. सकळीक ७३. नत ७४. सुकर ७५. मुनी ७७. गणंग ७९. बक्षीस ८०. गल्ली ८१. टांग ८३. तोडगा ८४. मनी ८५. लड्डू ८६. बखोट ८७. स्वार ८९. डच्चू ९०. थारा ९१. फावडे ९२. अलख ९३. पत ९४. रमणी ९५. निषाद ९६. शारदा ९७. बळे ९८. वाजवी ९९. अदा १००. काल १०१. जिणे १०४. ताटी




# राशिभविष्य

**रविवार ३१/०५/२०२६ ते शनिवार ०६/०६/२०२६**

## मेष

**आठवड्याचा** उत्तरार्ध तुमच्यासाठी चांगला आहे. मात्र सुरुवात अडथळे आणि अडचणींनी होणार आहे. अचानक व अनपेक्षित धनलाभाचा योग आहे. आधी गुंतवलेल्या पैशांचा आत्ता फायदा होईल. नवीन गुंतवणूक मात्र सावधगिरीने करावी. प्रवासाचे योग आहेत. कर्क राशीतील गुरूभ्रमण व्यावसायिक दृष्टीने फायदेशीर ठरणार आहे. स्वभाव थोडा हट्टी, आक्रमक होईल.

कौटुंबिक आघाडीवर कर्क राशीतील गोचर गुरुचे भ्रमण संमिश्र फलिते देणार आहे. घरामध्ये धार्मिक, समाधानाचे वातावरण राहील. मात्र अनपेक्षित खर्चामध्येही वाढ दिसून येत आहे, पण होणारा खर्च योग्य कारणांसाठी व योग्य ठिकाणी होईल. जोडीदार, कौटुंबिक सदस्य त्यांच्याशी वादविवाद टाळण्यासाठी तुम्हाला थोडा संयम राखावा लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये अडकलेली कामे पुढे सरकतील. परदेश, कायदा, विमा क्षेत्र यासंबंधी व्यवसाय असल्यास जास्त फायदा जाणवेल. प्रवास, नवीन व्यवहार होतील. तुमच्यातील कलागुणांना वाव मिळेल. नोकरदारांना आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने संधी मिळेल. व्यावसायिकांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

**शुभ दिनांक** : ४, ५, ६.

## वृषभ

**आठवड्याचा** पूर्वार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. ध्येयपूर्तीसाठी अडथळे पार करावे लागतील. जिद्द व संयम आवश्यक आहे. व्यावसायिक गोष्टींकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. आर्थिक लाभाच्या नवीन संधी उपलब्ध होतील. बोलताना काळजी घ्यावी. आर्थिक गुंतवणूक सध्या पुढे ढकला. नियमांचे उल्लंघन करू नका. सरकारी कामांबाबत विशेष काळजी घ्यावी. दंडात्मक कारवाई होऊ शकते. अति धाडस, घाई यावर नियंत्रण ठेवा. तुमच्याकडे असलेली कलात्मक, क्रियाशील वृत्ती व्यवसायात उपयोगी पडणार आहे.

कौटुंबिक जबाबदारी टाळता येणार नाही. वादविवाद टाळण्यासाठी सुसंवाद ठेवा. पुढाकार घेऊन सर्वांना सांभाळून घ्यावे लागेल. जोडीदार कामानिमित्त व्यस्त राहील. भावंडांशी जमवून घ्यावे लागेल. मित्रांबरोबर सहलीचे नियोजन होईल.

कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या श्रमाला भाग्याची साथ मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील. आधुनिक तंत्रज्ञान शिकून घ्यावे. नोकरदारांनी संयम राखून स्वतःच्या कामावरच लक्ष केंद्रित करावे. भागीदारीतील व्यावसायिकांनी संयम बाळगावा. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक** : ३१, १.

## मिथुन

**तुमचा** राशीस्वामी तुमच्याच राशीत असल्यामुळे तुम्हाला बळ मिळाले आहे. एकंदरीत हा आठवडा चांगला जाईल. उत्तरार्धात विनाकारण अनामिक भय राहील. इच्छाशक्ती चांगली राहील. ध्येय निश्चित करून त्याचा पाठपुरावा करा. यश नक्की मिळणार आहे. विरोधक सक्रिय होतील. परंतु तुमचीही क्षमता वाढणार आहे.

आर्थिक स्थिती चांगली राहील. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. त्यासाठी थोडा संघर्ष करावा लागेल. तुमच्या ज्ञानाचा व्यावहारिक पातळीवर उपयोग करून घ्या. मानसिक स्थैर्य आवश्यक आहे.

कुटुंबामध्ये आनंद व समाधानी वातावरण राहील. मन व नाती प्रयत्नपूर्वक सांभाळावी लागतील. कुटुंबाबरोबर प्रवासाचे योग असले तरी योग्य प्रकारे नियोजन करावे, अडचणी येऊ शकतात. जोडीदार, संततीबरोबर आनंदात वेळ घालवाल. अविवाहितांचे, प्रेमीजनांचे विवाह ठरतील.

कार्यक्षेत्रामध्ये सावधगिरीने निर्णय घ्या. जुनी येणी वसूल होतील. कामाचा ताण वाढणार आहे. नोकरदारांना संघर्ष करत, शत्रूंशी सामना करत उद्दिष्ट पूर्ण करावे लागेल. वरिष्ठांची मदत होईल. आरोग्यामध्ये सुधारणा होईल.

**शुभ दिनांक** : ३१, १, २, ३

## कर्क

**या** आठवड्यात गुरूमहाराजांचे तुमच्या राशीमध्ये आगमन होत आहे. अनेक कामे त्यामुळे मार्गी लागतील. भाग्याची साथ मिळेल. या आठवड्यात तुमचा भावनिक संघर्ष वाढू शकतो. व्यावहारिक दृष्टिकोन बाजूला ठेवू नका. भावनेच्या भरात घाईत घेतलेले निर्णय भविष्यात त्रासदायक ठरू शकतात. लाभाचे प्रमाण वाढणार असले तरी खर्च नियंत्रणात ठेवा. अनावश्यक खर्च होऊ शकतात. कौटुंबिक समस्या सुसंवादाने सोडवण्यावर भर द्यावा. अहंकार, मीपणा बाजूला ठेवावा. घरदुरुस्ती, घरातील व्यक्तींचे आजारपण यामुळे खर्च वाढू शकतात. त्यासाठी नियोजन करा. जोडीदाराचा सहभाग, सल्ला महत्त्वाचा ठरेल. मुलांच्या शैक्षणिक, व्यावसायिक प्रगतीने समाधान वाटेल.

कार्यक्षेत्रामध्ये कामाचा ताण वाढेल. परंतु अनेक कामे मनासारखी मार्गी लावता येतील. नियमांचे पालन जरूर करा. प्रतिष्ठा वाढेल. नोकरदारांना त्यांच्या कामाचे श्रेय मिळेल. वरिष्ठांचे वर्चस्व मान्य करून त्यांच्याशी संघर्ष टाळा. प्रत्यक्ष कृतीला महत्त्व द्यावे. कामामधील दिरंगाई नुकसान करू शकते.

**शुभ दिनांक** : २, ३, ४, ५.

## सिंह

**आठवड्याचा** पूर्वार्ध नियोजनासाठी वापरावा. उत्तरार्धात तुमच्या कष्टाचे फळ तुम्हाला मिळेल. कार्यक्षेत्रामध्ये नवीन आव्हान स्वीकारावे लागेल. त्यात तुम्ही यशस्वी व्हाल. भाग्याची साथ राहील. मनामधील शंका-कुशंका काढून टाका. त्यामुळे तुमच्या निर्णयावर, कामावर परिणाम होऊ शकतो. राशीस्वामी रवी कर्मस्थानी असल्यामुळे चांगल्या प्रकारे कार्यरत राहाल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. अनेक प्रकारचे लाभ होतील. गुंतवणूक करताना मात्र सावधगिरीने व अनुभवी तज्ज्ञाच्या सल्ल्यानेच करा.

घरापासून कामानिमित्त लांब जावे लागेल. कुटुंबासाठी आवर्जून वेळ काढा. कुटुंबाच्या दृष्टीने काही भाग्यकारक, शुभ घटना घडतील. त्यामुळे तणाव कमी होईल. तुमच्या संततीच्या दृष्टीने चांगला काळ आहे. जोडीदाराशी मात्र गैरसमज होणार नाहीत याची पूर्ण काळजी घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये आधुनिक कार्यशैली उपयोगी पडेल. तुमच्या नवीन योजना उपयुक्त ठरतील. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी लक्षात ठेवा. सरकारी व सामाजिक क्षेत्रामध्ये असणाऱ्याना अचानक घडणाऱ्या घटनांसाठी तयार राहावे लागेल. नोकरदारांना संघर्ष करावा लागला तरीही कामाचे श्रेय मिळाल्यामुळे दर्जा उंचावेल.

**शुभ दिनांक** : ५, ६.

## कन्या

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. सध्याचे ग्रहमान तुमच्यासाठी अनेक अर्थाने शुभ फलिते देणारे आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. केलेल्या कामाचे कौतुक होईल. अडथळे आले तरी त्यावर मात करण्याची जिद्द ठेवा. वादविवादाचे प्रसंग बुद्धिचातुर्याने टाळून महत्त्वाच्या कामासाठी तुमची ऊर्जा वापरा. नवीन ज्ञान, माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न कराल. व्यावहारिक भूमिका यश देऊन जाईल. ठाम निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. तुमचा राशीस्वामी बुध व भाग्यकारक शुक्र एकत्र आहेत.

घरामध्ये संमिश्र वातावरण असले तरी अनेक सकारात्मक गोष्टी घडतील. थोड्याफार समस्या असतील त्या चर्चेने व सुसंवाद ठेवून सोडवता येतील. मुलांचे प्रश्न हळूहळू मार्गी लावता येतील. जोडीदाराच्या दृष्टीने शुभ घटना घडतील. अविवाहितांचे विवाह ठरण्यासाठी चांगला काळ सुरू होत आहे.

कार्यक्षेत्रामध्ये विविध आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. हितशत्रू व स्पर्धक यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याप्रमाणे तुमच्या योजना तयार ठेवा. भागीदारीतील व्यवसाय यशस्वी ठरेल. नोकरदारांना आधी केलेल्या श्रमाचे फलित मिळेल.

**शुभ दिनांक** : ३१, १.

## तूळ

**या** आठवड्यात चढउतार जाणवतील. आत्मविश्वास चांगला ठेवून योग्य ते नियोजन करावे. वैयक्तिक, कौटुंबिक व व्यावसायिक आघाड्यांवर थोडा तणाव जाणवेल. परंतु भाग्याची साथ व तुमचे कष्ट यामुळे कार्यसिद्धी होईल. रागावर नियंत्रण ठेवा. बोलताना सौम्य शब्द वापरा. आर्थिक बचत करावी. गुंतवणूक करण्यास योग्य काळ आहे. आर्थिक तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. अनपेक्षित लाभ व खर्च दोन्हीसाठी तयार राहावे. प्रतिस्पर्धी कार्यरत होतील.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. जोडीदार व तुमच्यामध्ये तणाव टाळण्यासाठी सुसंवाद ठेवा. संयम राखणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या भवितव्यासाठी धावपळ करावी लागेल. मात्र मनासारख्या गोष्टी घडतील. ज्येष्ठांचे सल्ले, मत विचारात घ्यावे. कुटुंबाचा एकत्रित व्यवसाय असल्यास आर्थिक व्यवहारात पारदर्शकता ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या नवीन योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील. नवीन करार, व्यवहार लाभ मिळवून देतील. नोकरदारांना संयमाने स्पर्धकांना तोंड द्यावे लागेल. वरिष्ठांशी संघर्ष टाळावा.

**शुभ दिनांक** : ३१, १.

## वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली होईल. तुमचा राशीस्वामी स्वराशीत बलवान आहे. या ऊर्जेचा योग्य तो वापर करावा. धडाडी व नियोजन यामुळे कार्यसिद्धी करू शकाल. आर्थिक अंदाज सध्या चुकू शकतात. त्यामुळे सावधगिरी बाळगा. मानसिक अस्वस्थता राहील. प्रवासामुळे फायदा होईल. प्रतिष्ठा सांभाळा. कोणत्याही परिस्थितीत नैराश्य येऊ देऊ नका. कृतीला प्राधान्य द्या. स्वप्नरंजनामध्ये वेळ वाया जाईल.

वडिलोपार्जित संपत्तीसंबंधित काही प्रश्न असल्यास चर्चेने व चतुराईने सोडवण्यास प्राधान्य द्यावे. भावना व व्यवहार यामध्ये समतोल साधावा. जोडीदाराच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. मुलांच्या अडचणीत वाढ होणार आहे.

कार्यक्षेत्रामध्ये जशास तसे वागावे लागेल. प्रतिस्पर्धी कार्यरत होतील. आर्थिक नाकेबंदी होऊ शकेल. त्यासाठी योजना तयार ठेवा. कार्यपद्धतीत अचानक बदल करावा लागेल. मात्र तो फायदेशीर ठरेल. नोकरदारांनी योग्य ठिकाणी धाडस, धडाडी दाखवल्यास उपयुक्त ठरेल. स्वबळावर योजना पार पाडाव्या लागतील. उष्णतेचे, श्वसनाचे त्रास होऊ शकतात.

**शुभ दिनांक** : ३१, १, ५.

## धनु रास

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन करणे योग्य ठरेल. या आठवड्यात राशीस्वामी गुरू कर्क राशीत प्रवेश करत आहे. कर्क राशीत गुरू उच्चीचे फलित देतो. अनेक दृष्टीने हे भ्रमण महत्त्वाचे ठरणार आहे. योग्य तऱ्हेने कामाचे नियोजन व योग्य वेळेला कृती यामुळे यश मिळू शकते. तुमच्या इच्छाशक्तीच्या जोरावर कामे पार पाडाल. आर्थिक स्थिती सुधारणार आहे. अनपेक्षित लाभाबरोबरच खर्चही होऊ शकतो.

कौटुंबिक आघाडीवर लक्ष द्यावे लागेल. प्रयत्नपूर्वक चांगले वातावरण ठेवावे लागेल. नवीन वास्तुखरेदीचा योग आहे. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधित प्रश्न मार्गी लावता येतील. मुलांची प्रगती समाधान देईल. वादविवाद मात्र टाळावेत. जोडीदाराचे व्यावहारिक चातुर्य उपयोगी पडेल.

कार्यक्षेत्रामध्ये कामाच्या पद्धतीत बदल होईल. नोकरदारांना बढतीचे योग आहेत. तुमच्या अधिकारात वाढ होईल. नवीन व्यवहार, करार उपयुक्त ठरेल. तुमच्या योजना गुप्त ठेवा. पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक** : २, ३, ४.

## मकर

**एकंदरीत** आठवडा चांगला जाईल. कर्क राशीतील उच्चीचे गुरू महाराज तुम्हाला अनेक बाबतीत पाठबळ देणार आहेत. तुमच्या राशीस्वामी शनीवर गुरूची कृपादृष्टी असणार आहे. तुमच्यासाठी लाभदायक असणारा मंगळसुद्धा स्वराशीमध्ये आहे. असे अनेक ग्रहांचे शुभ संकेत आहेत. योग्य प्रकारे नियोजन करून या स्थितीचा उपयोग करून घ्यावा. तुमच्याकडून चुका होणार नाहीत यासाठी सावधगिरी बाळगावी. आक्रमकता, घाई नियंत्रणात ठेवा. बोलताना काळजी घ्या. आर्थिक आवक चांगली राहील. तसेच बचतही वाढेल. मोठी आर्थिक गुंतवणूक मात्र सध्या टाळावी.

घरामध्ये प्रयत्नपूर्वक शांतता राखावी लागेल. थोडे तणावाचे वातावरण राहील. जमीन खरेदीसाठी योग्य काळ आहे. आई, भावंडे यांचे मत विचारात घ्यावे लागेल. जोडीदाराशी मतभेद होऊ शकतात. मुलांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करू नका. त्यांना प्राधान्य द्यावे.

व्यवसायवृद्धीसाठी लोकसंग्रह वाढवावा. नवीन व्यवहार, करार लाभदायक ठरतील. कायदेशीर बाबींचा मात्र सावधगिरीने विचार करावा. हितशत्रूंशी बौद्धिक, व्यवहारिक पातळीवर सामना करावा लागेल. अति धाडस, घाई टाळा. नोकरदारांनी स्वतःचे स्थान बळकट करावे. आरोग्याच्या छोट्या तक्रारींकडेही दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक** : ३१, १, ५.

## कुंभ रास

**या** आठवड्यात अनेक आघाड्यांवर तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. पूर्वार्धात कामाचा ताण वाढला तरी त्यातून फायदा होणार आहे. आठवड्याच्या अखेरीला विनाकारण मानसिक दबाव जाणवेल. आर्थिक स्थितीबाबत चिंता राहील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. मानसिक अस्वस्थता राहील. निर्णय घेण्यासाठी अनुभवी व्यक्तीचा आवश्यकतेनुसार सल्ला जरूर घ्यावा.

घरामध्ये छोटे समारंभ साजरे होतील. परंतु संमिश्र वातावरण राहील. मतभेदामुळे जोडीदाराचा असहकार जाणवेल. संततीसाठी भाग्यकारक घटना घडेल. मित्रांचा सल्ला, अनुभव पारखून घ्यावा. भावंडांचे वर्चस्व राहील. घरातील ज्येष्ठांच्या अपेक्षा पूर्ण करताना तारांबळ उडेल.

कार्यक्षेत्रामध्ये छुप्या विरोधाचा सामना करावा लागेल. नवीन ओळखीतून व्यवसायवृद्धीच्या संधी उपलब्ध होतील. विचारपूर्वक अंतिम निर्णय घ्यावा. आर्थिक बाबतीत फसवणूक होऊ शकते. व्यावसायिकांना अचानक कामानिमित्त प्रवास करावा लागेल. तुमच्या अधिकारात वाढ होईल. नोकरदारांना संयम ठेवून स्वतःची क्षमता सिद्ध करावी लागेल. भविष्यात त्याचा लाभ होईल.

**शुभ दिनांक** : ३१, १, २, ३.

## मीन

**साडेसातीचा** काळ असला तरीही इथून पुढे गुरुकृपा तुमच्यावर असणार आहे. तुमचा राशीस्वामी गुरू शुभ स्थानी उच्च राशीमध्ये राहणार आहे. सकारात्मक विचारांनी पुढे जाऊन अनेक गोष्टी मनाप्रमाणे घडवून आणाल. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. या आठवड्याची सुरुवात नियोजनासाठी वापरावी. नंतरचा काळ चांगला आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. बचतीला प्राधान्य द्यावे. बोलण्यामध्ये आक्रमकता वाढेल.

कुटुंबामध्ये वादविवाद होऊ नये यासाठी तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. भावनेच्या भरात व्यावहारिक निर्णय घेणे टाळू नका. काही ठाम निर्णय घ्यावे लागतील. घरामध्ये छोटे समारंभ, गृह सजावट यामुळे आनंदी वातावरण राहील. खर्चाची तरतूद मात्र करावी लागेल. मुलांच्या भविष्यासाठी शुभ घटना घडतील.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक व अनपेक्षित घडामोडी घडतील. ठरवलेल्या कामामध्ये विलंब होऊ शकतो. त्यासाठी पर्यायी व्यवस्थेचा विचार करून ठेवा. नोकरदारांना आधी केलेल्या कामामुळे आर्थिक लाभ होईल. व्यवसायवाढीसाठी नवीन प्रशिक्षण घेणे उपयुक्त ठरेल. आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक** : २, ३, ४, ५.

- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

## आयपीएल फायनलसाठी आज मुंबई-अहमदाबाद दरम्यान विशेष रेल्वे



**मुंबई** - अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या अंतिम सामन्याला क्रिकेटप्रेमींची मोठी गर्दी होणार आहे. त्यासाठी पश्चिम रेल्वेने मुंबई आणि अहमदाबाददरम्यान विशेष रेल्वे गाडी चालवण्याची घोषणा केली आहे. पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या विशेष गाडीचे बोरीवली, सुरत आणि बडोदा येथे थांबे असतील. ०९०२१ मुंबई सेंट्रल-अहमदाबाद एसी सुपरफास्ट स्पेशल ही गाडी सकाळी ६.२० वाजता मुंबई सेंट्रल येथून सुटणार आहे. या ट्रेनमध्ये प्रीमियम शताब्दी-शैलीचा रेक असेल. त्यामध्ये एक्झिक्युटिव्ह चेअर कार, एसी चेअर कार, अनुभूती क्लास आणि व्हिस्टाडोम कोचचाही समावेश असेल, सामन्यानंतर परतण्यासाठी, पश्चिम रेल्वेने १ जून रोजी दोन अतिरिक्त विशेष गाड्यांचे नियोजन केले आहे. गाडी क्रमांक ०९०४४ अहमदाबाद ते वांद्रे टर्मिनस दरम्यान धावेल. अंतिम सामन्यात बंगळुरू आणि गुजरातचा संघ भिडणार आहे.

## ऑपरेशन सिंदूर २ साठी सज्ज आहोत
### लष्करप्रमुख जनरल द्विवेदी यांचा इशारा

■ पुणे

**भारतीय** लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी स्पष्ट केले की, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नसून सध्या केवळ युद्धविरामासारखी परिस्थिती आहे. गरज भासल्यास तिन्ही सेना 'ऑपरेशन सिंदूर २.०' राबवण्यासाठी २४ तास सज्ज आहेत.

पुण्यातील खडकवासला येथे झालेल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या १५० व्या पासिंग आऊट परेडमध्ये लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी बोलत होते. रिव्ह्यूइंग ऑफिसर म्हणून त्यांनी ३५५ कॅडेट अधिकाऱ्यांच्या परेडची सलामी स्वीकारली.



यावेळी कॅडेट्सनी मार्चपास्ट केला, तर फ्लायपास्टमध्ये लढाऊ विमान, चेतक हेलिकॉप्टर, सारंग एरोबॅटिक्स टीम आणि आकाशगंगा स्कायडायव्हिंग टीम यांनी सहभाग घेतला. यावेळी बोलताना जनरल द्विवेदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरने भारत चिथावणीला कशा प्रकारे ठोस प्रत्युत्तर देतो याचा नवा मापदंड निर्माण केला आहे. लष्करी कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच कॅडेट्सनी ही परंपरा कायम ठेवावी. आधुनिक युद्ध पूर्णपणे पारदर्शक झाले असून प्रत्येक हालचालीवर २४ तास लक्ष ठेवले जाते. त्यामुळे सैनिकांची तैनाती, लष्करी कारवाया आणि सीमावर्ती

» पान २ वर

## वर्सोवा-दहिसर उन्नत मार्गासाठी १२०० झाडे तोडण्यास मंजुरी

■ मुंबई

**वर्सोवा** ते दहिसर कोस्टल रोडच्या २२ किमी लांबीच्या उन्नत मार्गासाठी एकूण १९०० झाडे बाधित होणार आहेत. त्यापैकी १२०० झाडे तोडण्यात येणार असून, या प्रस्तावाला काल शुक्रवारी वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी देण्यात आली. बहुतांश झाडे ही चारकोप तसेच गोरेगाव भागातील आहेत. उर्वरित ७०० झाडांचे पुनर्रोपण पनवेलमध्ये करण्यात येणार आहे.

महापालिकेने ही झाडे हटवण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवला होता. पालिका आयुक्त हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असून, विविध राजकीय पक्षांचे नगरसेवक हे प्राधिकरणाचे सदस्य आहेत. महापालिकेचे सभागृह नेते गणेश खणकर यांनी सांगितले की, सागरी किनारा मार्गातील एक हजार ९०० झाडे तोडण्यास प्राधिकरणाकडून मंजुरी दिली आहे. त्यापैकी १२०० झाडे तोडावीच लागतील, तर उर्वरित झाडे पुनर्रोपित करावी लागतील. पनवेल येथे ही ७०० झाडे पुनर्रोपित केली जाणार आहेत.

## मंत्र्यांनी पक्षनिधीसाठी योगदान द्यावे! खा. पार्थ पवारांची सूचना

**ज्येष्ठ मंत्र्यांमध्ये नाराजीची चर्चा**

■ मुंबई



**राष्ट्रवादी** काँग्रेसचे खासदार पार्थ पवार यांनी मंत्री आणि आमदारांना पक्षनिधीसाठी आर्थिक योगदान देण्याची सूचना केली आहे. पक्षाची आर्थिक परिस्थिती चिंताजनक असल्याने मंत्र्यांनी उदारपणे पक्षासाठी निधी द्यावा, असे आवाहन त्यांनी केल्याचे समजते. या सूचनेमुळे ज्येष्ठ मंत्र्यांमध्ये नाराजी पसरल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादी पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवणे आणि आगामी राजकीय घडामोडींसाठी आर्थिक तयारी मजबूत करण्याच्या उद्देशाने निधी उभारणीवर भर देण्यात येत आहे. यासाठी मंत्र्यांना ठराविक रक्कम जमा करण्याच्या तसेच आमदारांना त्यांच्या विकासनिधीतून काही हिस्सा पक्षासाठी देण्याच्या सूचना देण्यात आल्याची चर्चा आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विविध मतदारसंघांसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी काही रक्कम पक्षाच्या कामासाठी वापरण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आल्याचे समजते. पक्षाच्या कामकाजासाठी आवश्यक निधी नियमितपणे उपलब्ध राहावा, यासाठी वरिष्ठ पातळीवर नियोजन सुरू आहे. सूचनांचे पालन न झाल्यास कठोर भूमिका घेतली जाऊ शकते, असा इशाराही दिल्याची माहिती आहे.

## उद्योगपती यश बिर्लांना परदेश प्रवासाची कोर्टाची परवानगी

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने उद्योगपती यशोवर्धन बिर्ला यांना २० सप्टेंबरपर्यंत परदेश प्रवास करण्याची परवानगी दिली आहे. तसेच, त्यांच्या विरोधात गंभीर फसवणूक तपास कार्यालय यांनी जारी केलेल्या लूक-आऊट सर्क्युलरच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे.

बिर्ला यांनी व्यवसाय आणि वैयक्तिक कारणांसाठी युके, युरोपातील काही देश, स्वित्झर्लंड, जर्मनी, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स येथे प्रवास करण्यासाठी न्यायालयाची परवानगी मागितली होती. त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, २०२२ ते २०२५ दरम्यान बिर्ला यांना चार वेळा परदेशात जाण्याची परवानगी देण्यात आली होती. प्रत्येक वेळी त्यांनी न्यायालयाने घालून दिलेल्या अटींचे पालन करून भारतात पुनरागमन केले होते. न्यायालयाने बिर्ला यांना प्रवासापूर्वी संपूर्ण प्रवासाचे वेळापत्रक, मुक्कामाचे पत्ते आणि संपर्क तपशील यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## झडती घेणे, मुद्देमाल जप्त करणे केवळ कागदी औपचारिकता नाही

**ड्रग प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता**

■ मुंबई

**झडती** घेणे, मुद्देमाल जप्त करणे, त्याचे नमुने घेणे आणि ते सीलबंद करणे या केवळ कागदी औपचारिकता नाहीत. आरोपीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यापासून आणि पुराव्यांमधील फेरफार रोखण्यासाठी दिलेले ते कायदेशीर संरक्षण आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सत्र न्यायालयातील विशेष एनडीपीएस न्यायालयाने नोंदवले. याच पार्श्वभूमीवर सरकारी पक्षाच्या अपयशावर बोट ठेवत न्यायालयाने ड्रग प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

ड्रग्ज बाळगल्याचा आरोप असलेल्या ३७ वर्षीय डॅनिश शेख या ड्रायव्हरला विशेष एनडीपीएस न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. शेखला २० ऑक्टोबर २०२२ रोजी वांद्रे येथील दंडाधिकारी न्यायालयाजवळ अटक करण्यात आली होती. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी संशयास्पद हालचालींवरून डॅनिश शेखला ताब्यात घेतले होते. त्याच्याजवळील प्लास्टिक पिशवीतून २१५ ग्रॅम 'मेफेड्रॉन' हा व्यावसायिक स्वरूपाचा अमली पदार्थ जप्त केल्याचा दावा पोलिसांनी केला होता. तथापि, विशेष न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. एम. सुंदळे यांनी सरकारी पक्षाच्या त्रुटींवर बोट ठेवत शेखच्या निर्दोष मुक्ततेचे आदेश दिले. अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत कडक शिक्षा सुनावताना तपासातील पारदर्शकता आणि कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तपास यंत्रणांनी प्रक्रियेत ठेवलेल्या गंभीर त्रुटींमुळे पुराव्यांशी छेडछाड होण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही, असे न्यायालयाने नमूद केले. गंभीर शिक्षेची तरतूद असलेल्या एनडीपीएससारख्या कडक कायद्यांमध्ये कॉल डिटेल्स आणि मोबाईल टॉवर लोकेशन यांसारखे इलेक्ट्रॉनिक पुरावे अत्यंत महत्त्वाचे ठरतात, असेही न्यायालयाने म्हटले.

## मुंबई अंडरवर्ल्ड-पाक आयएसआयशी संबंधित ९ दहशतवाद्यांना दिल्लीत अटक

■ नवी दिल्ली

**दिल्ली** पोलिसांच्या स्पेशल सेलने कारवाई करत पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि मुंबई अंडरवर्ल्डशी संबंधित नेटवर्कसाठी काम करणाऱ्या नऊ संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. या कारवाईमुळे दहशतवादी कट उधळण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आल्याचे सांगितले जात आहे.

दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या संशयितांना दिल्लीतील महत्त्वाच्या आस्थापनांवर तसेच सुरक्षा दलांच्या कर्मचाऱ्यांवर हल्ले करण्याचे काम सोपवले होते. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे आणि स्फोटके जप्त केली असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशातील सुरक्षाविषयक चिंतेच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी दहशतवादविरोधी उपाययोजना अधिक मजबूत केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ही कारवाई झाल्याचे सांगितले जात आहे.

दिल्लीचे पोलीस आयुक्त सतिश गोलछा यांनी काही दिवसांपूर्वी राजधानीतील प्रत्येक पोलीस ठाण्यात विशेष दहशतवादविरोधी पथके स्थापन करण्याचे आदेश दिले होते.

## बँक फसवणूक प्रकरणांची संख्या निम्मी झाली पण थकीत कर्जे वाढली! ४८,०२१ कोटींचा फटका

■ मुंबई

**भारतीय** बँकिंग क्षेत्रात २०२५-२६ या आर्थिक वर्षात फसवणुकीच्या घटनांची संख्या लक्षणीयरित्या कमी झाली. परंतु बँक फसवणुकीच्या रकमेत मोठी वाढ झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) वार्षिक अहवालातून ही माहिती समोर आली आहे.

या अहवालानुसार, बँक फसवणुकीची एकूण रक्कम ४६ टक्क्यांनी वाढून ४८,०२१ कोटींवर पोहोचली. २०१४-२५ मध्ये ही रक्कम ३२,८०३ कोटी रुपये होती.



फसवणुकीच्या प्रकरणांची संख्या २३,७२२ वरून जवळपास निम्म्यावर येत १०,११४ इतकी झाली. यावरून कमी संख्येने असलेल्या पण मोठ्या रकमेच्या फसवणुकीमुळे बँकांना मोठा फटका बसल्याचे स्पष्ट होते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा या फसवणुकीत सर्वाधिक वाटा असून, त्यांनी ३५,७०९ कोटी रुपयांच्या फसवणुकीची नोंद केली आहे. मागील वर्षी ही रक्कम २३,६१७ कोटी रुपये होती. खासगी क्षेत्रातील बँकांमध्येही फसवणुकीची रक्कम ८,९२७ कोटी रुपयांवरून वाढून ११,३९९ कोटी रुपयांवर पोहोचली. आरबीआयने स्पष्ट केले की, यामधील ३१४ प्रकरणे आणि ३०,१९९ कोटी रुपयांची रक्कम ही प्रत्यक्षात मागील वर्षांतील फसवणुकीशी संबंधित होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्च २०२३ च्या निर्णयानंतर फेरतपासणी व नियमपालन प्रक्रियेदरम्यान ही प्रकरणे २०२५-२६ मध्ये वर्गीकृत करून नोंदवण्यात आली.

## केदारनाथच्या देणगीचा पैसा व्हीआयपी पाहुणचारासाठी? चौकशीचे आदेश

■ डेहराडून

**केदारनाथ** धाम येथे भाविकांनी दिलेल्या देणगीच्या पैशाचा वापर राजकारणी आणि व्हीआयपी पाहुण्यांच्या पाहुणचारासाठी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत बद्री-केदार मंदिर समितीने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

माहितीच्या अधिकाराअंतर्गत मिळालेल्या माहितीत केदारनाथ येथे मुक्कामादरम्यान काही राजकीय नेते, त्यांच्या कुटुंबीय आणि प्रभावशाली पाहुण्यांच्या निवास, भोजन व इतर सुविधांवर हजारो रुपये खर्च करण्यात आल्याचे उघड झाल्याचा दावा करण्यात आला आहे. उत्तराखंडचे कॅबिनेट मंत्री गणेश जोशी यांच्या कन्या आणि भाजपा नेत्या नेहा जोशी यांच्या भेटीदरम्यान अवघ्या दोन दिवसांत सुमारे ६० हजार रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच केदारनाथच्या आमदार आशा नौटियाल यांच्या नावावरही सुमारे ३७,५०० रुपयांचा खर्च नोंदवण्यात आला आहे. या खुलाशानंतर सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली असून, केदारनाथ मंदिरातील दानपेटीत जमा होणारा निधी मंदिर व्यवस्थापन आणि भाविकांच्या सुविधांसाठी वापरण्याऐवजी व्हीआयपी पाहुणचारासाठी वळवला जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## मध्य रेल्वेच्या मुख्य, हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वेने मुख्य आणि हार्बर मार्गावर उद्या रविवार ३१ मे रोजी सीएसएमटी-विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर, तसेच कुर्ला-वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घोषित केला आहे. विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी हा ब्लॉक घेण्यात आला आहे. मेगाब्लॉक काळात मुख्य मार्गावरील विविध सेवांवर त्याचा परिणाम होणार आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सीएसएमटी-विद्याविहार दरम्यान अप-डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.५५ पासून दुपारी ३.५५ पर्यंत मेगाब्लॉक घेतला आहे. या कालावधीत सीएसएमटी



येथून सकाळी १०.४८ ते दुपारी ३.४५ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन धीम्या मार्गावरील सेवा सीएसएमटी आणि विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील.

## अपात्र शिक्षकांना टीईटी परीक्षा द्यावीच लागणार

**सर्वोच्च न्यायालयाचा निकाल**

■ नवी दिल्ली

**शिक्षक** पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांसाठी अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने अपात्र शिक्षकांना दिलासा देण्यास नकार दिला. न्यायालयाने टीईटी उत्तीर्ण करण्यासाठीची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२७ वरून वाढवून ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत वाढवली. मात्र त्यानंतर कोणतीही अतिरिक्त मुदत दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. मनमोहन यांच्या खंडपीठाने राज्य सरकारे, शिक्षक संघटना आणि वैयक्तिक शिक्षकांनी दाखल केलेल्या ६५ हून अधिक पुनर्विचार याचिका फेटाळून लावल्या. या याचिकांमधून २०२५ मधील निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षणात म्हटले की, टीईटी पात्रता नसलेले शिक्षक सेवेत कायम राहिल्यास त्याचा थेट परिणाम भावी पिढ्यांच्या शिक्षणावर होऊ शकतो. केवळ नोकरी जाण्याच्या भीतीपोटी गुणवत्तेच्या निकषांशी तडजोड करता येणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य हे कोणत्याही अन्य हितापेक्षा महत्त्वाचे आहे.

## मनिषा हवालदारला सीबीआय कोठडी तर मनिषा मांढरे न्यायालयीन कोठडीत

■ नवी दिल्ली

**देशभरात** खळबळ उडवणाऱ्या नीट यूजी पेपर फुटी प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून, या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींवर कारवाईचा वेग वाढला आहे. या प्रकरणातील आरोपी मनिषा हवालदार आणि मनिषा मांढरे यांना केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) विशेष सीबीआय न्यायालयात हजर केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मनिषा हवालदार हिला दोन दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे, तर मनिषा मांढरे हिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यामुळे मांढरे हिची रवानगी तुरुंगात करण्यात येणार आहे.



सुनावणीदरम्यान सीबीआयच्या वकिलांनी हवालदार यांच्या कोठडीची मुदत वाढवण्याची जोरदार मागणी केली. या प्रकरणात मोठ्या आर्थिक व्यवहारांचा संशय असून, त्याचे आर्थिक धागेदोरे शोधण्यासाठी अधिक चौकशी आवश्यक असल्याचे सीबीआयने न्यायालयात सांगितले. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने दोन दिवसांची कोठडी मंजूर केली. मनिषा हवालदार हिचे हस्ताक्षर व सहीचे नमुने घेण्यास सीबीआयने न्यायालयाची परवानगी मागितली आहे. फॉरेन्सिक तपासाद्वारे पेपरफुटीशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. याच प्रकरणातील आणखी एक आरोपी मनिषा वाघमारे हिच्या जामीन अर्जावर दिल्लीतील राऊज ॲव्हेन्यू न्यायालयाने सीबीआयला नोटीस बजावली आहे.

## इंधनबचतीच्या आवाहनाला हरताळ मंत्री राठोडांचा हेलिकॉप्टर दौरा चर्चेत

■ वाशिम

**देशातील** इंधनटंचाईच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले असतानाही राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केलेला हेलिकॉप्टर दौरा सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

नागपूर ते पोहरादेवी असा हेलिकॉप्टरमधून प्रवास करत राठोड यांनी बंजारा वास्तू संग्रहालयाची पाहणी केली. मात्र या दौऱ्यात त्यांच्या सोबत मोठा शासकीय आणि खासगी वाहनांचा ताफा असल्याचेही उघड झाले आहे. शासकीय वाहने आणि जवळपास १५ खासगी वाहनांचा लवाजमा या दौऱ्यात सहभागी असल्याची माहिती आहे. एकीकडे सरकारकडून इंधन बचतीचे आवाहन करण्यात येत असताना, दुसरीकडे मंत्र्यांकडूनच इंधनाची उधळपट्टी होत असल्याची टीका होत आहे.


**भावपूर्ण आदरांजली**



**कै.गं.भा. कौसाबाई गंगाराम पवळे**

वय वर्षे १०६
देवाज्ञा : शनिवार दि. २३/०५/२०२६ रोजी.

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी
अशी संतवाणी, आई म्हणजे
वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी...

-: दशक्रिया विधी :-
मंगळवार दि. ०२/०६/ २०२६ रोजी सकाळी ७.३० वा. घोडनदीच्या पवित्र तीरावर लांडेवाडी, चिंचोडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे होईल.

प्रवचनकार
ह.भ.प.माधुरीताई गाडे (इंदोरे) (साकोरे)

शोकाकूल
श्री. कचरनाथ गंगाराम पवळे (मुलगा),
श्री. भगवान गंगाराम पवळे (मुलगा),
के.शांताबाई शरद कामठे (मुलगी),

समस्त पवळे परिवार, आप्तेष्ट नातेवाईक,
समस्त ग्रामस्थ लांडेवाडी, चिंचोडी, शेवाळवाडी


**केरळमधील नवनिर्वाचित काँग्रेसप्रणित संयुक्त लोकशाही आघाडी सरकारने महिला आणि मुलींसाठी महत्त्वाच्या कल्याणकारी योजनांची घोषणा केली आहे. शाळकरी मुलींना दरमहा जास्तीत जास्त तीन दिवसांची मासिक पाळीची सुट्टी देण्याचा प्रस्ताव सरकारने मांडला आहे. तसेच ५० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व संस्थांमध्ये सुरक्षित आणि उच्च दर्जाची डे-केअर केंद्र तसेच पाळणाघरे सुरू करण्याची योजनेची घोषणाही केली आहे.**

## केरळमध्ये शाळकरी मुलींना मासिक पाळीची सुट्टी देणार

■ तिरुवनंतपूरम

**राज्यात** मुली आणि महिलांसाठी शैक्षणिक संस्था तसेच सार्वजनिक ठिकाणे अधिक अनुकूल बनविण्यासाठी 'प्रोजेक्ट मेन्स्ट्रुअल डिग्निटी' राबविण्यात येणार आहे. महिलांना सॅनिटरी नॅपकिन, बूट-चप्पल तसेच इतर आवश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. केरळला देशातील महिलांच्या दृष्टीने सर्वांत अनुकूल व सुरक्षित राज्य घडविण्याचा संकल्प राज्य सरकारने केला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

त्याचप्रमाणे 'निराश्रित आणि अनाथ-मुक्त केरळ' उपक्रमांतर्गत राज्यात दत्तक मोहिमा राबविल्या जाणार आहेत. कायद्याच्या आधारे प्रशिक्षित आणि योग्य मानधन देण्यात येणाऱ्या पालक कुटुंबांचे जाळे उभारले जाणार आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना विशेष लाभ, सहा महिने मातृत्व रजा दिली जाईल.

## वनताराविरोधी याचिका फेटाळली

■ जामनगर

**उद्योगपती** मुकेश अंबानी यांच्या जामनगर येथील वनतारा वन्यजीव पुनर्वसन केंद्राविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. वनतारामध्ये परदेशातून आणलेल्या प्राण्यांबाबत आधीच चौकशी झाली असून, त्याच मुद्द्यांवर पुन्हा तपास करण्याची गरज नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, यूएई, ब्राझील, व्हेनेझुएला, झेक रिपब्लिक आणि दक्षिण आफ्रिका या देशांतून आणलेले प्राणी सर्व आवश्यक परवानग्या आणि कागदपत्रांसह भारतात आणले आहेत. त्यामुळे हे हस्तांतरण पूर्णपणे कायदेशीर आहे. सध्या वनतारामध्ये सुरक्षित वातावरणात राहणाऱ्या प्राण्यांना तेथून हटवणे त्यांच्या हिताचे ठरणार नाही. उलट त्यांना त्रास होऊ शकतो.

## 'आरटीआय'खाली 'कुडनकुलम'ची सुरक्षा माहिती देण्यास कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**तामिळनाडूतील** कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाचा सुरक्षा विश्लेषण अहवाल माहिती अधिकारांतर्गत देण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, हा अहवाल माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८(१)(अ) अंतर्गत संरक्षित आहे. देशाचे वैज्ञानिक, धोरणात्मक, आर्थिक हितसंबंध आणि परराष्ट्र संबंधांना बाधा पोहोचवू शकणारी माहिती या कलमांतर्गत उघड करता येत नाही. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या २०१३ मधील जी. सुंदरराजन विरुद्ध केंद्र सरकार खटल्याचा हवाला दिला. त्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने प्रकल्पाच्या सुरक्षेची खात्री दिली होती. त्यामुळे सुरक्षेबाबत कोणतीही नवी शंका नसल्याने हा गुप्त अहवाल सार्वजनिक करण्याचे कोणतेही सबळ कारण नाही, असे न्यायालयाने म्हटले.

कुडनकुलम प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना २०१० मध्ये कार्यकर्ता एस. पी. उदयकुमार यांनी माहिती अधिकारांतर्गत सुरक्षा अहवाल, साईट मूल्यमापन अहवाल आणि पर्यावरणीय परिणाम अहवाल मागितले होते.